ग्रंथाली वाचक चळवळीचे

# रुची

जानेवारी २०१३ • मूल्य १० रु.



ग्रंथतुला
शरद पवारांची!

'बोल महामानवाचे' तीन खंडांचे प्रकाशन





'जीवन आणि स्वास्थ्य'चे प्रकाशन




वाचकदिनी झालेला परिसंवाद - 'विवाहाला लिव्ह इन रिलेशनशिपचा व्यवहार्य पर्याय!'

असीम सरोदे, कमलेश वालावलकर, प्रसन्न जोशी, मंगला आठलेकर, शाल्मली पेठे, सतीश तांबे आणि नीरजा

# वाचकदिन क्षणचित्रे

## वाचकदिनी पुरस्कारप्राप्त कवयित्रींचा सत्कार



उषा मेहता – को.म.सा.प. पुरस्कार



नीरजा – महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार

## पुस्तक प्रकाशने

प्रमुख पाहुण्यांची भाषणे



डॉ. पी.एस. रामाणी



डॉ. नरेंद्र जाधव



प्राचार्य व्ही.एन. मगरे




डॉ. नरेंद्र जाधव संपादित रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन ग्रंथत्रयीच्या जनावृत्तीचे डॉ. रामाणी यांच्या हस्ते प्रकाशन





निवेदिका स्नेहा आघारकर, लेखक – साहेबराव चवरे, चंद्रशेखर सानेकर, स्मिता भागवत, डॉ. उज्ज्वला दळवी
प्रमुख पाहुणे – डॉ. पी.एस. रामाणी, डॉ. नरेंद्र जाधव, प्राचार्य व्ही.एन. मगरे, लेखक – शरद बेडेकर, सदानंद डबीर, नंदिनी थत्ते–सुधीर थत्ते




ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

**जानेवारी, वर्ष ३१ वे,**
**अंक पहिला, मूल्य १० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**

**रुची – वार्षिक वर्गणी : १०० रुपये**

**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ.'ग्रंथाली' नावे**



पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

चिपळूण येथे ८६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन या महिन्यात भरत आहे. प्रा. नागनाथ कोत्तापल्ले तिथे अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतील. त्यांनाही शुभेच्छा.

राजकारणी आणि संमेलन, मराठी वाचन कमी झाले आहे का, विचार-तत्त्वे आणि मैत्री, चळवळीतील कार्यकर्ता आणि लेखक अशा वेगवेगळ्या विषयांवर कोत्तापल्लेसरांशी संतोष शेणई यांनी मारलेल्या मनमोकळ्या गप्पा या अंकात आहेत. कोत्तापल्ले यांचे स्पष्ट विचार नेहमीप्रमाणे यात दिसतात.

यावर्षी 'ग्रंथाली'ने एकूण पाच दिवाळी अंक प्रसिद्ध केले. पैकी 'रुची' सोडून अन्य चार इ-ग्रंथाली अंक होते. अमेरिका, कॅनडा, सौदी अरेबिया आणि युरोप-ऑस्ट्रेलिया हा जोड अंक. हे अंक मराठी माणूस आउट ऑफ रेंज नाही आणि त्याची मराठीशी नाळ तुटलेली नाही हे सिद्ध करतात. विद्या हर्डीकर-सप्रे, स्मिता भागवत, डॉ. उज्ज्वला दळवी, शुभदा परांजपे आणि योगिनी लेले यांनी अंकांचे संपादन तर केलेच, शिवाय यातून त्या त्या देशातील साहित्य व ओघाने लेखक मिळवले ही बाब उत्साहवर्धक आहे. मराठीतील असा हा पहिलाच प्रयत्न होता आणि त्याला लाभलेला प्रतिसाद उमेद वाढवणारा ठरला.

'विवाहाला लिव्ह इन रिलेशनशिपचा व्यवहार्य पर्याय!' हा विषय ग्रंथाली वाचकदिनी परिसंवादासाठी घेतला होता. काळ, काम आणि अर्थकारणाचा वेग याने बदललेल्या जीवनशैलीतून तयार होणारी सामाजिक-सांस्कृतिक रचना लक्षात घेता हा विषय की प्रश्न महत्त्वाचा वाटला. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला. या विषयावर चर्चा घडवून ग्रंथालीने समाजात विचारांना चालना दिल्याचे श्रोत्यांनी आवर्जून सांगितले. दरवर्षीप्रमाणे नव्या पुस्तकांचे प्रकाशन झाले.

आता जुळणी नव्या वर्षाची. या अंकात त्याची सुरुवात आपापल्या क्षेत्रांत कर्तबगारी गाजवताना समाजभान राखलेल्या दिग्गजांच्या मुलाखतींनी केली आहे. त्यातून पॉझिटिव्ह एनर्जी मिळेल.

**– कार्यकारी संपादक**

*मुखपृष्ठावरील छायाचित्रे*
**बोल महामानवाचे –** सुदेश हिंगलासपूरकर, विनोद शहा, कुमार केतकर, नागनाथ कोत्तापल्ले, मोहन धारिया, न्या. सुरेश सावंत, डॉ. नरेंद्र जाधव, रावसाहेब शिंदे व दिलीप पाडगावकर
**जीवन आणि स्वास्थ्य** – डॉ. नंदकिशोर लाड, डॉ. स्नेहलता देशमुख, डॉ. पी.एस. रामाणी, प्रतिमा रामाणी आणि अनुराधा ठाकूर

# प्रा. नागनाथ कोत्तापल्ले यांच्याशी मनमोकळ्या गप्पा...

**संतोष शेणई**

नागनाथ कोत्तापल्ले या नावाच्या उच्चारासरशी आठवतात ते ठाव घेणारे मोठे डोळे आणि सातमजली हसणं. काळं-सावळं; पण तरतरीत व्यक्तिमत्त्व. साधी राहणी, सौम्य बोलणं. गप्पा सुरु झाल्या, की त्यांचं समृद्ध वाचन लक्षात येऊ लागतं. एकेका साहित्यकृतीसंबंधीची त्यांची सूक्ष्म निरीक्षणं आणि त्याआधारे केलेलं मार्मिक विश्लेषण ऐकताना विस्मित व्हायला होतं. सामाजिक बांधिलकी मानण्याची वैचारिक भूमिका आणि फुले-आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानातून उगम पावलेल्या चळवळी, साहित्य यांना वैचारिक बळ पुरवण्याची त्यांची वाङ्मयीन भूमिका एकमेकांत घट्ट विणलेली आहे. व्यासंग, कष्ट, मेहनत, जिद्द, आत्मविश्वास, विपरीत परिस्थितीतही मार्ग काढण्याची हातोटी, माणसं समजून घेण्याची कला व ती जोडण्याचं कौशल्य, त्यासाठी आवश्यक असं स्वभावातलं, भाषेतलं मृदूपण असे निसर्गदत्त गुण त्यांना लाभले आहेत. त्यांच्याकडे उत्तम निर्णयशक्ती आहे; त्याचबरोबर विधायक राजकारण करण्याचं कसबही. यामुळेच ते शिक्षणक्षेत्रात कुलगुरूपदापर्यंत पोचले आणि साहित्यक्षेत्रात आता संमेलनाध्यक्ष झाले. त्यांचे महाविद्यालयीन मित्र अरुण प्रभुणे यांनी म्हटल्याप्रमाणे कोत्तापल्ले यांच्या जीवनाचा आलेख नेहमीच ऊर्ध्वगामी राहिला आहे. चिपळूण इथे होणाऱ्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर डॉ. कोत्तापल्ले यांच्याशी मोकळेपणानं रंगलेल्या या गप्पा.

*आपल्यावर महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव आहे. आपण 'जोतिपर्व' हा ग्रंथही लिहिला आहे. महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच्या काळातच महात्मा फुले यांच्या साहित्याकडे आपण वळला. हे कसं काय घडलं?*

देगलूरच्या आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य धर्माधिकारी यांच्या ग्रंथप्रेमाचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे. मोठा तत्त्वनिष्ठ माणूस. त्यापायी त्यांना नोकरीही गमवावी लागली. ते कुठेही गेले तरी ग्रंथ घेऊन येत. त्यामुळे त्या काळात माझं वाचन वाढलं. त्यांचा प्रभाव आहे, असं म्हटलं तरी तो बाजूला काढला म्हणजे मी अर्धा होईन असं नाही. कारण एका व्यक्तीचा, घटनेचा असा काही पूर्ण प्रभाव नसतो. तो त्या सर्व वातावरणाचा असतो. प्राचार्यांनी आम्हा विद्यार्थ्यांना बाबा आमटे यांच्या सोमनाथच्या पहिल्या श्रमसंस्कार शिबिराला पाठवलं होतं. तो वेगळाच अनुभव होता. पु. ल. देशपांडे, लता मंगेशकर यांना मी पहिल्यांदा तिथं ऐकलं होतं. मी तिथल्या कडक उन्हाळ्यानं चांगलाच आजारी पडलो आणि त्यामुळे बाबा आणि साधनाताईंचा खूप सहवास लाभला. या गोष्टीचाही खूप प्रभाव पडला होता. त्याच काळात सुधीर रसाळ यांच्या व्याख्यानात महात्मा फुले यांच्या साहित्याचा उल्लेख ऐकला आणि मी फुले यांचं साहित्य वाचू लागलो. ते साहित्य मला जवळचं वाटलं. मी त्याकडे ओढला गेलो.

*फुले यांच्या साहित्याच्या वाचनातून आपला चळवळ्या स्वभाव बनला असेल का, असा मी विचार करतो. आपण महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करत असताना सुरुवातीच्या काळातच संघर्ष केला होता. नेमकं काय घडलं होतं?*

खरं तर त्या प्रकरणाविषयी स्वतंत्र, सविस्तर व बारकाईनं लिहायला हवं. विद्यार्थी व प्राध्यापकांनी एकत्र येऊन संस्थेशी दिलेला लढा होता तो. आता तर शिक्षणसंस्थांमध्ये फारच वाईट परिस्थिती झाली आहे. त्यामुळे त्या संघर्षाबद्दल लिहिण्याची मोठी गरजही आहे. बीडमधील महाविद्यालयात मी शिकवत होतो. माझी ती पहिली नोकरी. त्यावेळी संस्थेनं प्राध्यापकांच्या पगारातून कापून घेतलेला प्रॉव्हिडंड फंड बँकेत जमाच केला नव्हता. जवळजवळ तीन वर्षांनंतर ही गोष्ट प्राचार्यांना समजली. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना सांगूनही ही रक्कम भरली जात नाही हे लक्षात आल्यावर त्यांनी ही गोष्ट प्राध्यापकांना सांगितली. त्याबरोबर संस्थेनं प्राचार्यांना निलंबित केलं. संस्थेच्या या अन्यायकारक वागण्यामुळे विद्यार्थी व प्राध्यापकांनी आंदोलन सुरू केलं. तीन वर्षं ते आंदोलन चाललं होतं. विद्यार्थ्यांचं नुकसान होऊ नये म्हणून प्राध्यापक झाडाखाली वर्ग घेत असत. अखेर धर्मादाय आयुक्तांनी हस्तक्षेप करून महाविद्यालय सुरू केलं. अर्थात पस्तीस वर्षांनंतरही ते प्रकरण न्यायालयात सुरूच आहे!


प्राध्यापकानं अध्यापनाबाबत

निष्ठावान असलं पाहिजे असं मानणारा मी आहे. आपले विद्यार्थीही आपल्याला शिकवत असतात. एकदा पुणे विद्यापीठात काही अचानक काम आल्यामुळे, मी विद्यार्थ्यांना आज वर्ग होणार नाही असा निरोप दिला. सर्व विद्यार्थी बाहेर निघून गेले. मीही माझ्या कामासाठी गेलो. पुन्हा आलो, तर माझ्या टेबलवर एक चिठ्ठी मिळाली. एका विवाहित, इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक वयाच्या विद्यार्थिनीनं लिहिलेली – 'मी घरापासून अठरा रुपये खर्च करून इथे येते. पैशांबरोबरच मला माझा वेळही महत्त्वाचा वाटतो.' या दोनच वाक्यांच्या चिठ्ठीनं मला खूप काही शिकवलं होतं. त्यानंतर कधीही लेक्चर चुकलं नाही.

*आपण साहित्य संस्थांच्या व्यवहारातही कार्यरत होता. तेथील राजकारणापासून स्वतःला दूर ठेवत त्या संस्थांच्या विकासाचा आपण विचार करत होता. आता साहित्य संमेलनाध्यक्षपदाकडे तुम्ही कोणत्या दृष्टिकोनातून पाहता?*

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा फुले, राजर्षी शाहू, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांसारख्या अनेक महामानवांचा फार मोठा वाटा आहे. किंबहुना त्यांच्या कार्यामुळे आणि वैचारिक योगदानामुळेच महाराष्ट्र पुरोगामी आणि आधुनिक झाला. महात्मा फुले, केशवसुत यांचा मी वारसदार आहे. न मी हिंदू, न मी ब्राह्मण, न मी एक पंथाचा.. ही माझी भूमिका आहे.

लेखन करताना, त्यानिमित्तानं समाजाचं निरीक्षण करताना, एकूणच साहित्यव्यवहार व जीवनव्यवहार, साहित्य आणि समाज यांविषयी विचार करत गेलो. हा विचार मांडण्यासाठी साहित्य संमेलनाचं व्यासपीठ योग्य आहे, असं वाटलं. कुठे मिरवण्यासाठी नव्हे, तर वैचारिक मंथनाची जागा यादृष्टीनं मी साहित्य संमेलनाकडे



पाहतो. यापूर्वीच्या साहित्य संमेलनाध्यक्षांची भाषणं पाहिलीत तर त्यांच्या वैचारिक, वाङ्मयीन भूमिका आपल्याला कळतात. तो एक महत्त्वाचा दस्तावेज बनतो. म्हणूनच विचारमंथनाची ही परंपरा चालू ठेवणं, पुढे नेणं हे आवश्यक आहे आणि तेच तर साहित्य संमेलनाचं प्रयोजन असतं.

*लेखक लिहितो कशासाठी? आपल्या लेखनाच्या प्रेरणा काय आहेत?*

मी आठव्या इयत्तेपासून म्हणजे १९६३पासून लिहितोय. एखादी कविता, छोटासा लेख असं त्याचं स्वरूप असे. आपलं नाव मासिकात छापून यावं, असं वाटायचं. मग मी लिहीत असे. खऱ्या अर्थानं लेखन करू लागलो ते साधारण १९६७-६८ नंतर, महाविद्यालयात गेल्यावर. कवी-कादंबरीकार प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी हे आम्हाला शिकवायला होते. त्यांच्या सहवासात वाचन-लेखन सुरू झालं. कवितेपासूनच सुरुवात झाली. पुढे कथा, कादंबऱ्याही लिहिल्या. स्वतः होऊन समीक्षा लेखनाला मी क्वचितच उद्युक्त झालो. कवितेवरील समीक्षा मी आवडीनं लिहिली, मात्र अन्य समीक्षालेखन हे चर्चासत्रातील निबंधवाचन, परीक्षणं, प्रस्तावना यासाठीच झालं.

'मुडस्' या काव्यसंग्रहासाठी राज्यशासनाचा विशेष पुरस्कारही मिळाला होता. बरेच दिवस कविता झाली नव्हती, पण आता पुन्हा कविता सुचण्याचा काळ आला आहे. कविता सुचत नाही याचं विलक्षण दुःख होत होतं. कविता तुमच्या तळातून, तुम्हाला आतून मोहरून टाकत येते. अर्थात कविता काय किंवा अन्य ललितलेखन काय, ते आपण का करतो हा अवघड प्रश्न आहे. लिहिणाऱ्या प्रत्येकाला तो कधीतरी पडतोच. निर्मितीक्षणाच्या विलक्षण आनंदासाठी मी लिहितो, असं एक उत्तर आहेच; पण ते पुरेसं नाही. निर्मितीचं सुख अलौकिक असतं खरंच, पण लेखक तेवढ्यासाठीच लिहीत नाही. लेखकाजवळ स्वतःची अशी दृष्टी असते. जीवनाकडे पाहण्याची दृष्टी. त्यामुळेच त्याला अनुभवाचं वेगळेपण हेरता येतं. जीवनदृष्टीच्या अनुषंगानं तो अनुभवात रंग भरतो, प्रसंगांची निर्मिती करतो, व्यक्तिमत्त्वांची निर्मिती करतो, त्यांची भाषा ठरवतो, तंत्र योजतो, या सगळ्यातून तो साहित्यकृती घडवतो.

मला जाणीव झाली तेव्हापासून माझं लक्ष प्रथमतः जीवनातील दुःखाकडे जातं. मी ज्या परिस्थितीमध्ये वाढलो त्यामुळेही असेल, पण मानवी दुःख, समाजातील असंतोष, वेदना या गोष्टी मला लिहायला उद्युक्त करतात. माणूस आपल्याच वर्तनानं दुःखाची निर्मिती करत असतो. अशा दुःखाचा शोध घेण्यात लेखक म्हणून मला अधिक रस आहे.

*आपण अध्यापनातील निष्ठेविषयी सांगितलं. आपल्यातील निष्ठावान शिक्षक आणि सृजनशील लेखक यांना एकमेकांचा कधी त्रास नाही झाला?*

एक खरं आहे, की शिक्षक आणि लेखक या दोन परस्परविरोधी भूमिका आहेत. म्हणजे असं, की एखाद्या साहित्यकृतीचे बारीक बारीक पदर उलगडत बसायचं, पिंजून काढायचं काम शिक्षकाला करावं लागतं. उलट, जगण्यातील सर्व पदर एकत्र करून त्यांची नीट गुंफण करायचं काम लेखकाला

करावं लागतं. त्यामुळे या दोघांनाही एकत्र ठेवणं थोडं गुंतागुंतीचं काम खरंच. पण मी शिक्षक म्हणून जी जबाबदारी स्वीकारली होती, तीकडे कधी दुर्लक्ष केलं नाही. जबाबदारी नीट सांभाळून मग लेखन करत गेलो.

*तुम्ही कथा-कादंबऱ्याही लिहिल्या आहेत आणि समीक्षापर लेखनही केलं आहे. आपल्यातल्या सर्जनशील लेखकाची समीक्षकाला कशी मदत होते?*

सर्जनशील लेखक असेल तर त्याचा समीक्षेला निश्चितच उपयोग होतो; कारण कलाकृती कशी निर्माण होते, त्यासाठी किती परिश्रम करावे लागतात, एखादी कलाकृती निर्माण होते, तेव्हा त्यात किती आणि कोणत्या प्रकारचे घटक मुरलेले असतात याची त्याला नेमकी जाण असते. हे घटक इतके विविध असतात आणि कलाकृतीत अंतर्भूत झालेले असतात, की ती सगळी व्यामिश्रता समजावून घेण्यासाठी कलावंतांचं मन हवं. शिवाय सर्जनशील कलाकाराला वाचकाच्या अभिरुचीचाही चांगला अंदाज असतो. समीक्षा लिहिताना त्याचा उपयोग होतोच. आस्वादाच्या पलीकडे जाऊन हे लेखन होऊ शकतं, ते या सगळ्या घटकांची जाण असल्यानं. साहित्यनिर्मिती ही काही अधांतरी घडणारी गोष्ट नव्हे. साहित्यकृतीच्या निर्मात्याचं व्यक्तिमत्त्व या जनसमुदायातलंच एक असतं. या समुदायाची एक संस्कृती असते, एक अर्थव्यवस्था असते. धर्म, इतिहास, राजकीय चळवळी यांतून हा समुदाय आकार घेतो. त्यातच लेखकाचं व्यक्तिमत्त्व घडतं. त्या पार्श्वभूमीवर त्याचा वाङ्मयव्यवहार समजून घ्यावा लागेल. साहित्यकृती निर्माण होताना हे सगळे संस्कार कार्यरत होतात. या प्रक्रियेची जाणीव लेखक म्हणून असते; त्यामुळे त्या प्रक्रियेचा उलगडा करण्यासाठी समीक्षकाला साह्य होतं.

*कलाकार आणि समीक्षक या भूमिका परस्परपूरक असतात, याविषयी फारसा वाद कदाचित होणार नाही; परंतु लेखक आणि कार्यकर्ता या भूमिकांची सांगड तुम्ही कशी घालता? विचारसरणी असलेल्या लेखकाच्या सर्जनशीलतेला काही मर्यादा येते, असं तुम्हाला वाटत नाही का?*

माझ्या मते लेखकाला विचारसरणी, जीवनदृष्टी हवीच. त्याच आधारावर त्याच्या अनुभवांची तो प्रतवारी लावू शकतो. काय चांगलं, काय वाईट, काय स्वीकारणीय आणि काय त्याज्य, हे तो ठरवू शकतो. एखाद्या अनुभवाला 'अनुभवपण' येतं ते विचारसरणीमुळेच; किंबहुना मी तर असं म्हणेन, की ज्यांना वैचारिक भूमिका नसते, विशिष्ट दृष्टिकोन नसतो, ते प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थक असतात. ते अशा रीतीनं 'जैसे थे'वादी असल्यानं बदल घडवण्याची आचच त्यांना नसते आणि ती नसल्यानं या बदलांची दिशा काय असावी, याचा विचार करण्याचाही प्रश्न येत नाही.

*आपण आता लेखकाला जीवनदृष्टी हवी, याविषयी आग्रहानं सांगितलंत. त्यापूर्वी आपण लेखकावरच्या संस्कारांविषयी बोलला होतात. या दोन्हींचा एकत्रित विचार करताना, आपण गोविंद बल्लाळ देवल व महात्मा फुले यांच्या नाटकांच्या अनुषंगानं उपस्थित केलेल्या जीवनमूल्यांसंबंधीच्या मुद्याची आठवण येते...*

हो. देवलांचं 'शारदा' आणि महात्मा फुले यांचं 'तृतीय रत्न' या नाटकांसंदर्भात विचार केला होता. 'शारदा व कोदंड यांचा विवाह व्हावा,' असा क्रांतिदर्शी विचार देवलांनी शेवटच्या प्रवेशात मांडला आहे; पण तो निर्णय शंकराचार्य देतात, असं त्यांनी दाखवलं आहे. एकीकडे फुले 'धर्मशोषणापासून मुक्ती हवी असेल, तर शिक्षण घ्या,' असा सल्ला देतात; तर दुसरीकडे 'कोणतेही प्रश्न सोडवायला धर्मालाच शरण जा,' असा सल्ला देवल देतात. असं घडलं; कारण दोघांच्याही जीवनमूल्यासंबंधीच्या कल्पना वेगळ्या आहेत. 'प्रचलित धर्मच पीडिताला न्याय देईल,' असं देवलांना वाटतं, तर 'प्रस्थापित धर्माकडून हे घडणं कधीही शक्य नाही,' असं फुले यांना वाटतं. लेखक ज्या सांस्कृतिक पर्यावरणात वाढतो, त्याचा हा परिणाम होय.

*आपण सांस्कृतिक पर्यावरणाबद्दल बोलत आहात म्हणून आता विचारतो, आपली स्वतःची नाळ वेगवेगळ्या चळवळींशी जोडली गेली आहे. वाङ्मयीन चळवळींवर आपण लिहीतही आला आहात. सध्याचं महाराष्ट्राचं वाङ्मयीन पर्यावरण संमेलनाध्यक्ष म्हणून आपल्याला समाधानकारक वाटतं का?*


वाङ्मयीन पर्यावरण ही तशी विस्तृत संज्ञा आहे. त्यात वाचक, लेखक, प्रकाशक, अध्यापक असे अनेकजण येतील. वेगवेगळ्या लेखनप्रकारांत काही तरुण लेखक खूप चांगलं लेखन करू लागले आहेत. एका वाक्यात सांगायचं, तर या सगळ्यात समीक्षक हा सर्वात कच्चा घटक वाटतो.

एकंदर वाङ्मयीन पर्यावरण फारसं उत्साहवर्धक आहे, असंही म्हणता येणार नाही. गेल्या पंधरा-वीस वर्षांत वैचारिक स्वरूपाचं आदानप्रदान होताना दिसत नाही. स्वतःपुरतं तळं राखणारे गट वाढलेत. जोरात आमनेसामने या. जे मांडायचं ते रोखठोक मांडा. पण तसं घडत नाही. कुणालाच मूलभूत प्रश्नांबद्दल बोलायचं नाही. आपली भूमिका नेमकी काय हे सांगायचं नाही, गुंतवून घ्यायचं नाही. सांस्कृतिक, वाङ्मयीन, सामाजिक जीवनातील प्रश्नांकडे आपण काणाडोळा करू लागलो आहोत. त्यामुळे वैचारिक घुसळण होत नाही. परिणामी, वाङ्मयीन चळवळी थंडावल्या आहेत. चळवळींनी नवी सामर्थ्यस्थानं शोधली पाहिजेत. अलीकडे मुद्यापेक्षा गुद्यावर येणं वाढलं आहे. भाषा, बुद्धी व तर्कशक्ती संपली, की माणसं गुद्यावर येतात. याचं प्रमाण अलीकडे वाढल्यानं व्यक्तिगत जीवनात परिवर्तन कसं आणता येईल, याकडे चळवळींनी अधिक लक्ष द्यायला हवं. तरच समाज उन्नत होईल.

*वाङ्मयीन पर्यावरणाचा एक घटक म्हणून आपण वाचकाचा उल्लेख केला आहे. आपण मराठीचे प्राध्यापक होता. कुलगुरू होता. महाराष्ट्रात सध्या सर्व विद्यापीठांतून मिळून दरवर्षी चार-पाच हजार विद्यार्थी मराठी विषय घेऊन पदवीधर होतात. पण अजूनही पुस्तकांची हजार-दोन हजार प्रतींचीच आवृत्ती काढावी लागते. ही परिस्थिती काय आहे? एकोणिसाव्या शतकात पदवीधरांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात दबदबा निर्माण केला होता. आज पदवीधरांची संख्या वाढल्यावर हा दबदबा का दिसत नाही?*

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर पदवीधरांचा पूर्वीसारखा दबदबा उरला नाही, ही वस्तुस्थिती आहे. मुख्य कारण असं, की शिक्षणाचा विस्तार खूप झाला आणि गुणवता घसरली. गुणवता असेल तर दबदबा निर्माण होईल. महाविद्यालयांची, पदव्युत्तर केंद्रांची संख्या खूप वाढली. विद्यार्थ्यांना सहज, घराजवळ शिक्षणाची सोय उपलब्ध झाली. म्हटलं तर ही आनंदाची गोष्ट आहे. दरवर्षी मराठीचे पाच हजार विद्यार्थी पदवीधर होतात, ही मराठीसाठी सुखद व अभिमानाची गोष्ट असायला हवी. पण मुळात गुणवत्ता हरवलेला शिक्षणविस्तार आपण केला आहे. त्यामुळे सांस्कृतिक व्यवहारात हे उच्च विद्याविभूषित नसतातच. ते महाराष्ट्राच्या वैचारिक जीवनाला काही वळण देऊ शकत नाहीत. लोकांना कोणत्याही मार्गानं पदव्या हव्या असतात, नोकऱ्या हव्या असतात.

मराठी शिकणारे विद्यार्थी कोण असतात, हेही पाहिलं पाहिजे. शहरांतील विद्यार्थी मराठी शिकताना अभावानंच दिसतो. शहरी महाविद्यालयातही ग्रामीण भागांतूनच विद्यार्थी मराठी शिकायला येताना दिसतात. मराठी विषय त्यांना सोपा वाटतो. सध्या शुद्धलेखनही पाहिलं जात नाही. नोकरीसाठी पदवी मिळवणं हे ध्येय असल्यानं मराठी विषय घेणं सोपं वाटतं. काही विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला मराठी साहित्य हा विषय घेता येत असल्यानं या विषयाकडे येतात. फारच



कमी विद्यार्थी साहित्याच्या, भाषेच्या आस्थेपोटी येतात. हे जे आस्थेपोटी येणारे विद्यार्थी आहेत, तेच साहित्याचे वाचक असतात.

वाचकसंख्येचा प्रश्न मराठीपुढे जुनाच आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात वाचकांचं प्रमाण वाढतं आहे. नव्या माध्यमांमुळे वाचन घटल्याचं मला मान्य नाही. नवे वाचकगट तयार होत आहेत. ज्ञानाबद्दल उत्सुक असलेल्या नव्या समाजगटांतून वाचक तयार होत आहेत. त्यामुळे चैत्यभूमीवर बाबासाहेबांची, बौद्ध तत्त्वज्ञानाची, दलित साहित्याची पुस्तकं जशी विकली जातात, तशी समाजपरिवर्तनाची चर्चा करणारी पुस्तकंही मोठ्या प्रमाणात जातात.

*परिवर्तनासाठी वैचारिक भूमिका हवीच,' हा तुमचा आग्रह समजू शकतो; परंतु सर्जनशील साहित्याच्या दृष्टीनं तो कितपत योग्य आहे? साहित्य प्रचारी बनण्याचा किंवा त्याच्या कलात्मकतेला बाधा येण्याचा धोका तुम्हाला जाणवत नाही का?*

अजिबात नाही. उदाहरणार्थ, नारायण सुर्वे यांना स्पष्ट अशी वैचारिक भूमिका होती; परंतु त्यामुळे त्यांची कविता कमअस्सल ठरली नाही. उलट, त्यामुळे त्या कवितेला एक वेगळीच धार आली. 'आयडिऑलॉजी असणं म्हणजे कलात्मकता नसणं', हे समीकरणच मला योग्य वाटत नाही. वि. स. खांडेकरांचा उत्कट ध्येयवाद त्यांच्या साहित्यात प्रतिबिंबित होतो, म्हणून महाराष्ट्रानं त्यांची काहीशी उपेक्षाच केली; परंतु त्यांचं साहित्य अन्य भाषांमध्ये अनुवादित झालं आहे आणि इतर भाषकांनी त्यांचं साहित्य अक्षरशः डोक्यावर घेतलं आहे. अगदी जुन्या काळाचा विचार केला तरी 'ज्ञानेश्वरी', 'अमृतानुभव', 'तुकाराम गाथा', 'कबीराचे दोहे' या सगळ्या

साहित्यांत विचारसरणी आहेच. शब्दांचा कशिदा काढणाऱ्यांविषयी आपण विचार करत नाही; पण कोणतीही चांगली कलाकृती घ्या, कलावंतांचे शब्द आयडिऑलॉजीनं भारित असतात. त्यात जीवनार्थ सांगण्याचं सामर्थ्य असतं. त्यामुळेच चांगलं साहित्य वाचकाला अस्वस्थ करतं. एखाद्या अनुभवाला 'अनुभवपण' येतं ते विचार-सरणीमुळेच. किंबहुना मी तर असं म्हणेन, की ज्यांना वैचारिक भूमिका नसते, विशिष्ट दृष्टिकोन नसतो, ते प्रस्थापित व्यवस्थेचे समर्थक असतात. ते अशा रीतीनं 'जैसे थे'वादी असल्यानं बदल घडवण्याची आचच त्यांना नसते आणि ती नसल्यानं या बदलांची दिशा काय असावी, याचा विचार करण्याचाही प्रश्न येत नाही. ज्या साहित्याला मूल्यभान आहे ते साहित्य आपल्या संस्कृतीतही भर घालत असतं, संस्कृती विकसित करत असतं. लेखक ही जबाबदारीची गोष्ट आहे, असं मला वाटतं.

*आपण म्हणालात की, लेखक ही जबाबदारीची गोष्ट आहे. हे खरंही आहे. पण त्याच्यावरची जबाबदारी स्पष्ट कराल?*

मी मगाशी म्हटलं, तसा लेखकाला मूल्यविवेक करता आला पाहिजे. हा मूल्यविवेक समाजातील दंभाचा, खोटेपणाचा, हितसंबंधांचा स्फोट करणारा असला पाहिजे. या दृष्टीनं एक माणूस आणि एक लेखक म्हणून माझी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय या मूल्यांवर निष्ठा आहे. परंतु खरं स्वातंत्र्य आणि खरी समता सर्व प्रकारच्या विषमता घालवल्या-शिवाय प्राप्तच होऊ शकणार नाही. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय कसा मिळणार आणि बंधुता तरी कशी विकसित होणार? मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा प्रयत्न करता आला पाहिजे, लेखकाला तर करता आलाच पाहिजे. सामाजिक व सांस्कृतिक विषमताही आर्थिक विषमतेतूनच निर्माण होते, हे विसरता कामा नये. या दृष्टीनं जीवन समजून घेण्याची, समजून घेताना विवेक ठेवण्याची आणि त्यातून साहित्यकृती निर्माण करण्याची जबाबदारी लेखकावर असते, असं मला वाटतं.

*सर, अलीकडेच औरंगाबादला मराठा साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर, 'लिहायला बसताना मी मराठा असल्याचं आधी आठवतो'- असं बाबा भांड म्हणाले होते. असा जातीय अहंकार ही लेखनाची प्रेरणा ठरेल काय?*

अजिबात नाही. जातिसंस्था समजून घेणं वेगळं आणि त्याचा अहंकार बाळगणं, त्याचा आग्रह धरणं वेगळं. जातीचा अहंकार बाळगणारी विधानं भालचंद्र नेमाडे यांनी पहिल्यांदा केली आणि आता त्यांच्या प्रभावाखालचे इतर लेखक, नेमाड्यांचे प्रकाशकही तशीच विधानं करू लागले आहेत. हे सारंच मोठं दुर्दैवी आहे. नेमाडे यांनी एक विधान केलं होतं, की आपली जात पक्की माहीत असणाऱ्याला पृथ्वीच्या कोणत्याही अक्षांश-रेखांशावर डौलानं उभं राहता येतं. मला सांगा, चर्मकार, मांग यांनी कोणत्या डौलानं उभं राहावं? नेमाडे असंही म्हणाले, की आपल्या परंपरेतील उदारतेचा विचार करता आता सेक्युलॅरिझमची या देशाला गरज नाही. पण सेक्युलॅरिझमला पर्याय ठरू शकतील अशी परंपरेतील उदाहरणं त्यांनी दिली नाहीत. केवळ ढोबळ, आपल्याला सोयीस्कर विधानं करायची, ही नेमाड्यांची पद्धती आहे. ते त्याची शेवटापर्यंत कधी मांडणी करत जात नाहीत.

लिहायला बसल्यानंतर जर तुम्हाला तुमची जात आठवत असेल, तर लेखक म्हणून तो तुमचा सर्वात मोठा पराभव आहे. लेखकानं स्वतःला जातिव्यवस्थेला बांधून घेणं म्हणजे आपली ओळख बंदिस्त करणं होय. लेखकांनी जातीच्या कक्षेतून बाहेर पडायला हवं. साहित्याच्या क्षेत्रात जात डोकावत आहे, हे चित्र धोकादायक आहे. खरं तर, मानवी जीवनाचं दुःख माझंच आहे, असं ज्याला वाटतं, तोच चांगला लेखक होय. देश एकमय होण्यासाठी जातीच्या, या खोट्या मर्यादांच्या पलीकडे, किमान कल्पनेच्या पातळीवर तरी पुढे जा. चांगल्या समाजाच्या निर्मितीची स्वप्नं पाहा. लेखकाची ती जबाबदारी आहे.

*आपण म्हणालात की स्वतःला सोयीस्कर अशी ढोबळ विधानं करण्याची भालचंद्र नेमाडे यांची पद्धती आहे. नेमाडे यांची कथेविषयी व देशीवादाविषयी काही भूमिका आहे. त्याबाबतही आपण असंच म्हणाल का? आपल्या भूमिकेच्या सोयीसाठी ते दुसऱ्याची रेघ पुसूनच टाकण्याचा प्रयत्न करतात, असं वाटतं का?*

होय. आपल्याला सोयीस्कर भूमिका घेण्याची पद्धती मराठीला काही नवीन नाही. गंगाधर गाडगीळ यांनी एका ठिकाणी कविता ही साहित्य नाहीच, अशी भूमिका मांडली होती. कारण त्यांनी कधी कविता लिहिली नव्हती. त्यांना कथा हा वाङ्मयप्रकार सर्वात महत्त्वाचा वाटत होता. कारण ते कथा लिहीत होते. अर्थात कवितेला गौणत्व देण्याचा मुद्दा त्यांनी कधी रेटला नव्हता. नेमाडेंचं तसं नाही. ते त्यांचा मुद्दा सतत रेटत व दुसऱ्यांवर लादत राहतात. नेमाडेंनी कथेला दुय्यम ठरवलं. त्यांच्या दृष्टीनं कादंबरी सर्वात महत्त्वाची गोष्ट. पण जागतिक पातळीवर पहिल्यापासून कथा लिहिली गेली आहे. त्यात विविध प्रयोग झाले आहेत. माणसानं त्याला जे सांगावंसं वाटतं त्यासाठी आधी गोष्टी लिहिल्या, मग कादंबरी लिहिली गेली. पण नेमाड्यांनी त्यांच्या कादंबऱ्यांसाठी त्यांना सोयीस्कर अशी भूमिका घेतली. केवळ भूमिका घेतली असं नाही, तर आपल्याला सोयीस्कर गोष्टींचं समर्थन सतत करत राहायचं आणि त्याव्यतिरिक्त गोष्टींना दुय्यम ठरवायचं हे त्यांचं धोरण असतं.

देशीवादाविषयी बोलायचं झालं तर तो इतका मला महत्त्वाचा वाटत नाही. तो अखेर जीवनवादाचाच भाग आहे. पाश्चात्त्य परंपरांचं आणि संस्कृतीचं आपल्यावरील आक्रमण हा आपल्या सगळ्यांच्याच चिंतेचा मुद्दा आहे. जागतिकीकरणाचे नेमके काय

परिणाम होत आहेत, याचाही आपण शोध घेत आहोतच. वाङ्मयविश्व हे आपल्या सांस्कृतिक जीवनाशी निगडित असतं. त्यामुळे आपल्या वाङ्मयाची पाळंमुळं आपापल्या संस्कृतीमध्येच शोधली पाहिजेत, किंबहुना ती साहित्यनिर्मितीची पूर्वअट आहे हे कोणालाही मान्य होईल. या पार्श्वभूमीवर 'आपापल्या भूमीमध्ये पाय घट्ट रोवून उभं राहिलं पाहिजे' अशा अलंकारिक भाषेतील देशीवाद पुरेसा स्पष्ट होत नाही. विशेषतः भारतासारख्या देशावर प्राचीन काळापासून आक्रमणं झाली आहेत. बाहेरून लोक येत राहिले व त्यांच्या वसाहती झाल्या. इथल्या लोकांनीही या प्रत्येक समूहाला सामावून घेतलं. त्यांच्याकडून काही नवं स्वीकारलं आणि खूपसं जुनंही कवटाळून धरलं. जुन्या-नव्याचं मिश्रण केलं. मग या देशातील खरा देशीवाद कसा शोधायचा? या लोकांमधील देशीयता नेमकी कोणती असं सांगायचं? पंथ, उपपंथ, जाती, जमाती आणि त्यांचं परस्परांचं शोषण याचा अर्थ देशीवादी भूमिकेतून कसा लावायचा? या प्रश्नांची उत्तरं नेमाडे देत नाहीत. या पार्श्वभूमीवर, अभिजन व बहुजन या परिभाषेत बोलणं अधिक योग्य होणार नाही का? देशीवादाचा रोख पुनरुज्जीवनवादाकडे जाण्याचा धोका आहे आणि त्याचा बंदोबस्त देशीवादाला करता येईल, असं वाटत नाही. खरं तर एखादा साहित्यसिद्धांत मांडत असताना जीवनमूल्यं कोणती आहेत आणि वाङ्मयमूल्यं काय मानायची हाच खरा प्रश्न असतो. हा प्रश्न टाळून जेव्हा देशीवादाची उभारणी केली जाते, तेव्हा गूढरंजनापेक्षा वेगळं काही आपल्या हाती लागण्याची शक्यता नसते.

*मी पुन्हा आपल्या साहित्याकडे वळतो. आपला चळवळींशी संबंध आहे. त्यामुळे असेल, आपल्या 'मध्यरात्र' या कादंबरीत राजकारण येतं. पण त्याबाबत फारशी चर्चा झाली नाही.*

हो. मी मगाशी सांगितल्याप्रमाणे, महाविद्यालयात असताना सोमनाथच्या श्रमसंस्कार शिबिरात घेतलेला सहभाग, बाबा व साधनाताई आमटे यांचा लाभलेला सहवास, महात्मा फुले यांच्या ग्रंथांचं वाचन यामुळे असेल, पण चळवळींशी माझा संबंध येत गेला. मराठवाड्यातील दुष्काळात मी स्वयंसेवक म्हणून वावरलो होतो. डॉ. अरुण लिमये यांच्याबरोबर खडी केंद्रांवर औषधवाटप करत होतो. एका केंद्रावर एक वृद्ध स्वातंत्र्यसैनिक जोडपं भेटलं. त्यांच्याकडे पाहायला कुणी नव्हतं. म्हणून सत्तरी-बाहत्तरीत त्यांना खडीकेंद्रावर काम करावं लागत होतं. ते चित्र यातना देणारं होतं. याच काळात माझा दलित पँथर चळवळीशीही संबंध आला. परिवर्तनाच्या लढ्यातील अनेक चळवळींतील कार्यकर्ते माझे चांगले मित्र होते, मी या चळवळींशी जोडला गेलो होतो. त्यामुळे राजकारण चांगलं परिचित होतं. ते या कादंबरीत आलं आहे. पण त्या कादंबरीची फारशी चर्चा झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे.

आपल्याकडे लोकांना ग्रामीण, दलित, राजकीय असं ठळकपणे अधोरेखित साहित्य लागतं. माझ्या कादंबरीत इथलं जीवन येत असल्यानं हे सगळेच प्रकार एकवटून येतात. त्याचा परिणाम म्हणून त्याची चर्चा केली गेली नसेल, असं मला वाटतं. माझ्या लेखनात माझे प्रत्यक्ष अनुभव मांडले गेले आहेत.

*अलीकडे लेखकांना सर्व प्रकारचे विषय हाताळणं कठीण होत आहे. काही विषय त्यांना टाळावे लागतात, असं वाटतं का?*

आपल्या राज्यात दहशती असंख्य प्रकारच्या आहेत. दहशतवादीच दहशत माजवतात, असं नाही. काही सामाजिक घटकही सांस्कृतिक दहशत निर्माण करत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. हे घटक एक प्रकारची सेन्सॉरशीप लेखकांवर लादत आहेत. हे खरं असलं, तरी हेही खरं आहे, की मराठीतील बरेच लेखक कल्पित भीतीनं आधीच गारद झालेले दिसतात.

*मराठीच्या वाङ्मय इतिहासासंदर्भात आपला गो. म. कुलकर्णी यांच्याशी वाद झाला होता. वाङ्मय इतिहास लेखनाबाबत आपली भूमिका काय आहे?*

गो. म. कुलकर्णी यांचं काम खूपच मोठं आहे. त्यांचं माझ्यावर प्रेम होतं, विश्वास होता. पण वैयक्तिक संबंध व भूमिका यात कधी मी गल्लत केली नाही. डॉ. गं. ना. जोगळेकर यांच्याशीही माझा वाद झाला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अलीकडच्या वाङ्मय इतिहासामध्येही महात्मा फुले यांच्या साहित्याचा विचार करण्यात आला नव्हता. पण त्यानंतर डॉ. जोगळेकर यांनी माझ्याकडूनच लिहवून घेऊन नव्या खंडांमध्ये त्याचा समावेश केला.

गो. म. कुलकर्णी यांच्याबरोबरही असाच तात्त्विक वाद झाला होता. महाराष्ट्राच्या एका कालखंडावर टिळक-आगरकरांचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. लोकमान्य टिळकांच्या निबंधांनी समाजजीवनाला दिशा देण्याचं काम केलं आहे. आगरकरांच्या विचारांच्या प्रभावातून त्या काळी काही कादंबरी लेखनही झालं होतं. त्यामुळे या काळाला टिळक-आगरकर युग म्हणायला हवं, असं माझं मत होतं. याच काळात महात्मा फुले हेही मध्यवर्ती येत होते. त्याचा विचार व्हायला हवा, असं मला वाटत होतं.

मराठी वाङ्मय इतिहासात फक्त महाराष्ट्रातील साहित्याचाच विचार करणं योग्य नाही, अशी माझी भूमिका होती. जिथे मराठी माणूस आहे, तिथे मराठी साहित्य आहे. केरळ, मदुराईतून मराठी साहित्य गोळा करण्यात आलं आहे. तंजावर, भोपाळ, इंदूर इथे तर मराठ्यांचे राज्यच होतं. या सर्व भागांतील मराठी साहित्याचा आढावा घेतला गेला पाहिजे, ही अपेक्षा होती.

*महात्मा फुले यांच्या लेखनाचं मोठेपण कशात आहे?*

फुले यांनी केलेलं मिथकभंजन मला सर्वांत महत्त्वाचं वाटतं. माझ्याकडून 'जोतिपर्व' सलग लिहिलं जायला हवं होतं.

त्यांनी मिथकांचं भंजन करून त्यातील मूळ अर्थ शोधला आहे. त्यांच्या काळात त्यांच्या साहित्याकडे पुरेसं लक्ष गेलं नाही. दुर्लक्षच झालं. पण काळ जसजसा लोटतो आहे, तसतसं हे साहित्य अधिकाधिक समकालीन होत आहे. हे मोठ्या लेखकाचं लक्षण आहे. त्यांचा 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ म्हणजे माणूसपणाचा मॅनिफेस्टो आहे.

खरं सांगायचं, तर वैचारिक प्रबोधनपर साहित्य हे मराठीचं वैभवच आहे. एकोणिसाव्या शतकातील वैचारिक साहित्यात प्रामुख्यानं तीन मुद्यांची चर्चा झालेली दिसते. स्पृश्य-अस्पृश्यता किंवा जातिव्यवस्था, स्त्री शिक्षण म्हणजे स्त्री स्वातंत्र्य आणि शेतकऱ्यांच्या म्हणजेच बहुजनांच्या उत्थानाचा मुद्दा. हे तीन विशेष चर्चेचे मुद्दे राहिले. त्यानंतर काही प्रमाणात आर्थिक विषमतेच्या मुद्याची चर्चा झाली. लोकहितवादींनी या चर्चेत महत्त्वाची कामगिरी केली आहे. मी विचार करतो, की स्त्रीस्वातंत्र्याची, स्त्रीव्यक्तिमत्त्वाला मान्यता देण्याची आपली भूमिका इतक्या वर्षांत किती बदलली आहे? अस्पृश्यता कमी झाली, पण जातिव्यवस्था अजून टिकून आहे, त्याचं काय करायचं?

*याच काळात मराठी भाषाही सशक्त झालेली दिसते. अनेक नव्या विषयांची चर्चा मराठी समर्थपणे करू शकत होती. आताच्या काळात मात्र ती ज्ञानभाषा होण्यापासून दुरावते आहे, असं दिसतं. मराठीचा ज्ञानभाषेकडचा प्रवास कसा सुरू ठेवता येईल?*

आपली भाषा लोकभाषेकडून ज्ञानभाषेकडे गेली पाहिजे, हे वाटणं स्वाभाविक असंच आहे. पण दुर्दैवानं मराठीच्या संदर्भात अशी काही फारशी समाधानकारक परिस्थिती सध्या नाही. मी 'सध्या' हा शब्द मुद्दाम योजला आहे. कारण अध्यात्मासंबंधी ज्ञानव्यवहार पेलण्याचं सामर्थ्य मराठीत असल्याचा साक्षात्कार ज्ञानदेवांना तेराव्या शतकात झाला होता. ज्ञानाचं वहन करण्यास मराठी सक्षम असल्याचा अनुभव एकोणिसाव्या शतकात आपण घेतला आहे. सध्या मात्र हे चित्र दिसत नाही. जगातील विविध प्रकारचं ज्ञान आपल्या भाषेत आणण्यासाठी त्या त्या भाषेतील लोकांना आणि शासनाला विशेष परिश्रम करावे लागतात. महाराष्ट्र शासनानं मराठीच्या विकासासाठी अनेक संस्थांची उभारणी केलेली दिसते. शासनानं मराठीमध्ये श्रेष्ठ दर्जाचे विश्वकोष निर्माण केले ही आपल्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. मात्र, साहित्य आणि संस्कृती मंडळ, राज्य मराठी विकास संस्था, लोकसाहित्य समिती या संस्था लाल फितीला तोंड देत काम करत आहेत. त्यामुळे हे प्रयत्न फारच तोकडे पडत आहेत. विद्यापीठ पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाचं कार्य निधीच्या, इच्छाशक्तीच्या अभावी बंद पडलं आहे.

परभाषेतील उत्तम ज्ञान मराठीत आणणं आणि मराठीतील ज्ञान परभाषेत पोहोचवणं असा अनुवादांचा दुहेरी मार्ग अवलंबला गेला पाहिजे. त्यासाठी आपल्या भाषेत ज्ञानाची निर्मिती व्हायला हवी. अशी ज्ञानाची निर्मिती सध्या आपल्या भाषेत किती होते आहे, याचा विचार करा. आपल्याला इंटरनेटवर मराठीतील ज्ञान पोहोचवायचं आहे, असा विचार केला तर आपण काय टाकू? ज्ञानेश्वर, चक्रधर, तुकाराम, शाहिरी वाङ्मय, बखर वाङ्मय, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांचं साहित्य आपण टाकू शकू. लोकसाहित्य देऊ शकतो. ते जगभर वाचलं जाईल. भारतीय आयुर्वेद, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र या गोष्टी देऊ शकतो. पण हे सगळं जुनं आहे. आपण सध्या नव्यानं कोणतं ज्ञान निर्माण करत आहोत, वेगवेगळ्या क्षेत्रांत अशी काय मूलगामी भर घालत आहोत, की जगानं त्याची दखल घ्यावी? आपण आपल्या शिक्षणपद्धतीत परीक्षेत गुण मिळवायला आणि पर्यायानं स्मरणशक्तीला महत्त्व दिलं आहे. विचारशक्तीला आवाहन करण्याला स्थानच ठेवलेलं नाही. अर्थ समजून विचार करायचा असतो, हे आपण मुलांना शिकवतच नाही. जर विचारशक्तीला चालना देणारं शिक्षण नसेल, तर नवं ज्ञान निर्माण होणार कसं? अर्थात जोवर विचारशक्तीला चालना देणारं शिक्षण येत नाही, तोवर अन्य भाषांमधील ज्ञान मराठीत आणण्याचा प्रयत्न कसोशीनं केला गेला पाहिजे.

*सर, मला वाटतं की जागतिकी-करणाच्या दडपणाखाली आपण मातृभाषेला दुरावत आहोत. आक्रमक भांडवलादारी व्यवस्था तिची स्वतःची भाषा, तिची स्वतःची जीवनशैली तुम्हाला आत्मसात करायला लावते. त्यासाठी तुमच्या स्वाभिमानाच्या गोष्टी पहिल्यांदा नष्ट करते.*

अगदी खरं आहे. खरं तर आपल्या सगळ्या जगण्याला व्यापून उरणारी अशी आपली मातृभाषा असते, म्हणून तिचा अभिमानच वाटला पाहिजे. आपल्या भाषेबद्दल कधी लाज वाटता कामा नये. आज मराठीत बोलणाऱ्यापेक्षा इंग्रजीत बोलणाऱ्याला सामाजिक प्रतिष्ठा दिली जाते. हे गैर आहे. त्यासाठी आपल्या शासनानंही काही ठाम असा धोरणात्मक विचार केला पाहिजे. कोणत्याही पक्षाचं सरकार असलं तरी त्यांना भाषा, साहित्य, संस्कृती यांच्याशी काहीही देणंघेणं नसतं, हा आपला अनुभव आहे.

मात्र त्याचवेळी आपलंही चुकत आहे. आपणा प्रत्येकाची काही बोलीभाषा असते, पण आपल्या प्रमाणभाषेचं आपल्याच बोलीभाषांशी उदार, समावेशक, प्रेममय असं नातं आपण निर्माण केलेलं नाही, हे मान्य करायला हवं. बोलीतील असंख्य शब्द अतिशय अर्थपूर्ण असतात. त्या शब्दांच्या स्वीकारातून पारिभाषिक शब्द उपलब्ध होतील. पण बोलीभाषेकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन अलीकडेपर्यंत न्यूनगंडाचाच होता. आता हा न्यूनगंड कमी झाला आहे, पण अजून प्रमाण मराठी व बोली यांच्यामध्ये सौहार्दाचं नातं निर्माण झालं आहे, असं दिसत नाही.

*आपण बोलीभाषेसंबंधी बोलतो आहोत, पण लोकसाहित्याची स्थिती काय*

*आहे? शासनाची लोकसाहित्य समिती अस्तित्वात आहे की नाही याचाही पता लागत नाही. मराठीत लोकसाहित्याचं संकलन खूप झालं, पण त्या क्षेत्रातील संशोधनाचं काय?*

अलीकडच्या काळात विद्यापीठ पातळीवर संशोधनात हवं ते गांभीर्य दिसून येत नाही ही वस्तुस्थिती आहे. हे गांभीर्य निर्माण होण्यासाठी विशेष प्रयत्न व्हायला हवेत. लोकसाहित्यात विशेष संशोधन होणं गरजेचं आहे. लोकसाहित्यात मानवी विकासाचे टप्पे दडलेले आहेत. सामान्य माणसाच्या अंतर्मनातील आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. त्यामुळे या आविष्काराकडे सकारात्मक पद्धतीनं पाहायला हवं. स्थानिक समाजरचना समजावून घेऊन लोकसाहित्य अभ्यासायला हवं. तसंच, धर्माच्या नावाखाली समाजात चुकीच्या गोष्टींची पेरणी होत असेल तर संशोधनाच्या माध्यमातून त्याला आळा घालण्याची गरज आहे.

*विद्यापीठाचा विषय आलाच आहे, त्यामुळे पुन्हा त्याकडे वळू. आपली भूमिका सर्वांना माहीत होती. त्यामुळे राज्यपालांकडून संमत झाल्यानंतरही काही काळ कुलगुरू म्हणून आपली नियुक्ती लांबणीवर पडली होती. तुमच्याकडे उपद्रवमूल्य म्हणून पाहिलं जात होतं का? कुलगुरूंच्या कामात राजकीय हस्तक्षेप किती होतो?*

एक स्पष्ट आहे, की तुम्ही करू दिलात तरच राजकीय हस्तक्षेप होतो, अन्यथा नाही. दडपण आणण्याचे प्रयत्न जरूर होतात. पण कुलगुरू सक्षम असेल आणि तो आपल्या मतांशी ठाम असेल तर राजकारणी तुम्हाला आडवे येऊ शकणार नाहीत, हा माझा अनुभव आहे. कुलगुरूंना राज्यपालांचं संरक्षण असतं, हे लक्षात घेतलं पाहिजे. मी एका मंत्र्याला त्याचं काम होणार नाही, असं तोंडावर सांगितलं होतं. त्याला त्यामागचं कारण स्पष्ट केल्यावर त्यानंही आग्रह सोडला. तुम्ही ठाम असायला हवं. योग्य पद्धतीनं काम करत नसलेली पंधरा महाविद्यालयं मी बंद केली, त्यावेळीही कोणी मला अडवलं नाही.

*साहित्य संमेलनातील राजकीय व्यक्तींच्या उपस्थितीची नेहमीच चर्चा होते. याबाबत आपली भूमिका काय?*

मला गंमत वाटते, की बाकी सर्व क्षेत्रांत तुम्ही राजकारण्यांबरोबर असणार आणि फक्त ते संमेलनाच्या मंडपात आले तर ती त्यांची घुसखोरी ठरवणार! म्हणजे पगारवाढ हवी असली की तुम्हाला डाव्यांनी तुमच्याबरोबर रस्त्यावर यायला हवं असतं. कॉलनीत रंगरंगोटी, मंदिर उभारायचं असलं की तुम्हाला उजव्यांची आठवण होणार. मतदानासाठी तुम्ही काँग्रेस किंवा राष्ट्रवादीबरोबर असणार. मात्र संमेलनाचा मंडप म्हटला की राजकारण्यांना दूर ठेवा म्हणणार. हा दुटप्पीपणा झाला. साहित्याचं क्षेत्र असं जीवनापासून वेगळं काढता येणार नाही. जीवनात जे आहे, ते तिथेही आहे. बालवाडीत मुलाच्या प्रवेशासाठी एखाद्या साहित्यिकाला राजकारण्याची चिठ्ठी लागत असेल, तर संमेलनात तो शेजारी बसलेला का नको? त्या त्या क्षेत्राची स्वायतता जपायला हवी हे ठीकच आहे. पण म्हणून राजकारण्यांनी संमेलनात येऊच नये असं म्हणणं हा चमत्कारिक आग्रह होय. श्रेष्ठ लेखन करणारे लोक राजकारणात होते, हे कसं विसरता? महात्मा गांधी, पंडित नेहरू, यशवंतराव चव्हाण यांनी किती सुंदर लेखन केलं आहे. विनोबा भावे यांनी सोपं मराठी कसं असतं हे आपल्याला दाखवलं आहे. रफिक झकेरिया यांचा धर्मावरचा अभ्यासपूर्ण ग्रंथ, नंबुद्रीपादांनी केलेलं संस्कृतीचं विश्लेषण आपण दुर्लक्षणार आहोत? नरसिंह रावांनी केलेले अनुवाद आपल्याला माहीत आहेतच. काका कालेलकर, यशवंतराव गडाख यांनी केलेल्या लेखनाची रसिकांनी दखल घेतली आहे. मग तुम्ही राजकारण्यांना साहित्य संमेलनात बंदी कशी घालाल? एक रसिक म्हणून संमेलनाला येण्याचा राजकारण्यांना पूर्ण अधिकार आहे.

राजकारण्यांशी भांडण्याची ठिकाणं वेगळी आहेत, हे साहित्यिकांनी लक्षात घेतलं पाहिजे. मतपेटी हे राजकारण्यांशी भांडण्याचं ठिकाण आहे, पण तिथे आम्ही निष्क्रिय राहतो. राजकारण्यांशी भांडण्याचं ठिकाण तुमचं साहित्य आहे, पण आम्ही आमच्या साहित्यातून भांडत नाही. नको तिथे भांडणाची ठिकाणं आणतो.

**– संतोष शेणई**

९८८१० ९९०१६





# एक अजब कोलाहल

**चंद्रशेखर सानेकर**

इतिहासाचे दंश जिव्हारी, भविष्य अपुले हेच अता
आपण केवळ अवडंबर माजवले आहे मिथकांचे

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

## रसिक वाचकहो!

**एखादे वाङ्मयीन नियतकालिक जेव्हा ५० वर्षे पूर्ण करते तेव्हा तो त्या मासिकाबरोबरच वाचकांचाही सन्मान असतो, कारण अशी वाङ्मयीन नियतकालिके समाजात वाचनसंस्कृतीचे संवर्धन करत असतात. १९६४ साली सुरू झालेले 'ललित' मासिक पन्नास वर्षे पूर्ण करत आहे हा आपल्या सर्वांसाठीच आनंदाचा आणि अभिमानाचा सोहळा आहे. यानिमित्त आम्ही इतर अनेक वाङ्मयीन उपक्रमांबरोबरच पुढील दोन महत्त्वाचे उपक्रम हाती घेत आहोत.**

ललित
सुवर्णमहोत्सवी वर्ष २०१३
(जानेवारी २०१३ ते डिसेंबर २०१३)

'ललित' मासिकाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त जानेवारी ते डिसेंबर २०१३ या कालावधीत कायमचे संग्राह्य ठरतील व अभ्यासकांस दिशादर्शक होतील असे दहा विशेषांक व एक दिवाळी अंक असे एकंदर अकरा अंक प्रकाशित होणार आहेत. अंकांचे विषय व अतिथी संपादक पुढीलप्रमाणे –

**वाचनसंस्कृती** (संजय भास्कर जोशी), **कविता** (वसंत पाटणकर), **ललित गद्य** (वि. शं. चौघुले), **समीक्षा** (विलास खोले), **वाङ्मयीन नियतकालिके** (सतीश काळसेकर), **चरित्रे–आत्मचरित्रे** (मीना वैशंपायन), **कथा** (पुष्पलता राजापुरे–तापस), **दृश्यकला** (वसंत सरवटे/दीपक घारे), **नाटक** (अनंत देशमुख), **कादंबरी** (नागनाथ कोत्तापल्ले) आणि नेहमीप्रमाणे दर्जेदार **दिवाळी अंक**.

हे सर्व अंक 'ललित'च्या वर्गणीदारांस त्यांच्या वर्गणीतच दिले जाणार आहेत. जे अजून ललितचे वर्गणीदार नसतील त्यांनी ताबडतोब वर्गणीदार व्हावे आणि या वाचनीय व अभ्यासनीय अंकांचा लाभ घ्यावा.

जानेवारी २०१३ पासून 'ललित' मासिकाच्या वर्गणीचे दर पुढीलप्रमाणे आहेत :

**वार्षिक वर्गणी : २८० रुपये**

**चार वर्षांची सवलतीची वर्गणी : १००० रुपये**

## ललितची वर्गणी म्हणजे सांस्कृतिक भविष्यासाठी 'इन्व्हेस्टमेंट'!

- **आपल्या प्रियजनांची वर्गणी भरा आणि खास भेट मिळवा :**
- **५ वर्गणीदारांची ४ वर्षांची वर्गणी मिळवून दिल्यास ५०० रुपयांची 'मॅजेस्टिक'ची भेट पुस्तके घरपोच!**

**ललित सुवर्णमहोत्सव समिती**

अध्यक्ष
**मधु मंगेश कर्णिक**
कार्याध्यक्ष
**वसंत सरवटे**

सदस्य
**विलास खोले**
**मीना वैशंपायन**
**अनंत देशमुख**
**संजय भास्कर जोशी**

सचिव
**शुभांगी पांगे**
निमंत्रक
**अशोक केशव कोठावळे**

वर्गणीचा डीडी/मनिऑर्डर **'ललित मासिक'** या नावाने ३०८ फिनिक्स, ४५७ एस. व्ही. पी. रोड, गिरगाव, मुंबई–४००००४ या पत्त्यावर पाठवावी किंवा 'ललित'च्या बँक ऑफ महाराष्ट्र, गिरगांव शाखेच्या २००५३७०१००६ या बँक खात्यात जमा करून majesticph@gmail.com या इमेलवर पैसे भरल्याचे तपशील कळवावेत.

# मराठी–उर्दूतला जिंदादिल दुवा... विनय वाईकर


**प्रवीण बर्दापूरकर**

१९७० च्याआधी , किमान भारतात तरी उर्दू गझल गायन आणि श्रवण ज्यांना गाणं येतं आणि कळतं अशा वर्गापुरतं मर्यादित होतं. त्याला तत्कालीन सामाजिक कारणंही होती. त्यात गझल गायकी कोठ्याची मक्तेदारी असाही एक (गैर) समज मोठ्या प्रमाणात होता. मेहदी हसन आणि मग गुलाम आली या पाकिस्तानी गायकांनी भारतात गझल लोकप्रिय करायला सुरूवात केली; नेमक्या याच दरम्यान जगजित–चित्रा सिंग यांचं युग उजाडलं. प्रामुख्यानं जगजितसिंग, चित्रा आणि त्यांच्या काही समकालीन गायकांनी उर्दू आणि उर्दू मिश्रित गझल घरा–घरात नेली. हिंदी चित्रपट गीत किंवा हिंदी सुगम संगीत ऐकणारा गझल ऐकण्याकडे वळवण्याचं श्रेय जगजित आणि चित्रा सिंग या दाम्पत्याला जातं. घरात, नाक्यावर आणि बार अशा सर्व ठिकाणी केव्हाही गझलचे मधाळ स्वर ऐकू येण्याचे ते दिवस होते. तलत महेमूद म्हणजे गझल हे तोपर्यंत सर्वमान्य असणारं समीकरण जगजित–चित्रा यांनी बदलून टाकलं! ही गझल ऐकायला सोपी वाटत असली तरी त्यातील बरेच शब्द नवीन होते, त्यांचे अर्थ सहज न लागणारे/ कळणारे होते. हे अर्थ सांगणारे जाणकार सहज उपलब्ध नव्हते आणि नेमक्या याच काळात 'आईना–ए–गझल' हा शब्दकोश आला. डॉ. जरीना सानी आणि डॉ. विनय वाईकर या दोघांची ही निर्मिती होती. डॉ. सानी यांचं अकाली निधन झाल्यावर डॉ. वाईकर यांनी हा प्रकल्प एकट्यानं सिद्धीस नेला आणि 'आईना–ए–गझल' म्हणजे डॉ. वाईकर अशी ओळख बनली. डॉ. वाईकर यांच्या निधनानंतर 'आम्हाला गझल कळली ती केवळ 'आईना–ए–गझल' आणि डॉ. वाईकर यांच्यामुळे', अशी प्रतिक्रिया फेसबुक या सोशल साईटवर व्यक्त झाली ती काही उगाच नव्हे.


नागपूर पत्रिका आणि नागपूर टाइम्स ही दैनिके प्रकाशित करणाऱ्या नवसमाज लिमिटेडचे कार्यकारी संचालक नरेश गद्रे यांनी १९८१च्या जानेवारी महिन्यात 'हा माझा मित्र डॉ. विनय वाईकर, आम्ही राजा म्हणतो त्याला' अशा शब्दात माझी विनय वाईकर यांच्याशी ओळख करून दिली. तेव्हा मी नागपूर या दैनिकात रिपोर्टर म्हणून रुजू होऊन जेमतेम आठ–दहाही दिवस झालेले नसावेत. ही ओळख एका प्रदीर्घ चालणाऱ्या उबदार, डौलदार आणि उमद्या मैत्रीची नांदी आहे याची पुसटशीही कल्पना मी मनाला शिवू दिली नव्हती, कारण कार्यकारी संचालकाचा मित्र असणारा आपल्यासारख्या भुक्कड रिपोर्टरला फुक्कट विचारणार नाही याची खूणगाठ मी ही ओळख होता क्षणीच मनाशी बांधली होती. अवघ्या काहीच दिवसांत ही खूणगाठ उलगडली आणि राजाभाऊ नावाच्या एका जिंदादिल माणसाशी आपली मैत्री झाली आहे याची खात्री दैनंदिन पटायला लागली. त्यांच्या जाण्यानं आता तो एक मनाच्या कुपीत जपून ठेवलेला भूतकाळ झालेला आहे...

राजाभाऊंशी झालेल्या प्रत्येक भेटीत या माणसाचा नवा पैलू कळत होता. विनय वाईकर मूळचे बालाघाटचे. शालेय शिक्षणानंतर ते नागपूरला आले आणि नागपूरकर झाले. त्यांचे आई–वडील दोघंही मराठी आणि हिंदी साहित्याचे चाहते आणि चौफेर वाचक होते. डॉ. वाईकर यांच्या आईंना, प्रभावती यांना भेटण्याची संधी मला अनेकदा मिळाली. आईंचं वाचन विविधांगी तसंच बहुभाषक होते आणि महत्वाचे म्हणजे सखोल होते. त्यांचा संस्कृतचा व्यासंग दिग्मूढ करणारा होता. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दूतील कोणतीही रचना त्या तत्काळ संस्कृतमध्ये भाषांतर करू शकत असत! डॉ. विनय वाईकर यांचं भाषाप्रेम हे असं मातृत्वाची देण असावं. नागपूरसारख्या बहुभाषक शहरात आणि त्यानंतर लष्करातील नोकरीच्या निमित्तानं जे विविध ठिकाणी वास्तव्य झालं त्यातून बहुभाषा ममत्वाचा डॉ. वाईकर यांच्यावरील हा संस्कार विशाल व डेरेदार होता गेला असावा.

व्यवसायानं भूलतज्ज्ञ असणाऱ्या या डॉक्टरनं सैन्यात तब्बल दहा वर्षं शॉर्ट सर्व्हिस कमिशन म्हणून घालवली. १९६३, १९६५ आणि १९७१ अशा तीन युद्धांत हा डॉक्टर रणभूमीवर होता. या डॉक्टरची पत्नी स्त्री रोगतज्ज्ञ आहे, त्याचा दोन मुली आणि एक मुलगा असा भरला परिवार आहे, या परिवारात या डॉक्टरच्या आईचा शब्द प्रमाण आहे वगैरे माहिती समजत गेली. कौटुंबिक बाबीशिवाय ठळकपणे लक्षात आलं ते या माणसाला साहित्याची आवड आहे आणि उर्दू शेर–शायरी हा त्याचा प्राण आहे. मराठी, हिंदी आणि इंग्रजीशिवाय या माणसाला उर्दू भाषा चांगली अवगत आहे आणि महत्त्वाचं



**डॉ. विनय वाईकर**




म्हणजे डॉ. जरीना सानी यांच्या सोबत उर्दू शब्दांचा हिंदी, मराठी आणि इंग्रजीत अर्थ सांगणाऱ्या एका वेगळ्या शब्दकोश-निर्मितीच्या कामात राजाभाऊ मग्न आहेत. वैद्यक व्यवसायाची उपजीविकेपुरती किमान अवधानं संपली की या शब्दकोशाच्या कामासाठी ते मोठा वेळ देतात. हे काम संपलं की मित्रांच्या गोतावळ्यात रमणारा, असे स्वभावाचे विविध पैलू लक्षात आले. तेव्हा माझी पत्नी नसलेली मंगला विन्चुरणे नागपूर पत्रिका या दैनिकाची साहित्य, कला, विज्ञान या रविवार पुरवणीच्या कामात यमुनाताई शेवडे यांना मदत करत असे आणि या पुरवणीत होणारी माझी मोठी लुडबूडही सहन करत असे. या पुरवणीत उर्दू गझलचा मराठीत अर्थ सांगणारं सादर राजाभाऊ यांनी सुरू करावं असा आग्रह मी धरला. मेहदी हसन, गुलाम अली यांच्या गझलनं पागल होण्याचा आणि चित्रा-जगजित सिंग यांनी गारुड केल्याचा, जगजित-चित्रानं गझल घरा-घरात पोहोचवल्याचा तो कालखंड होता. गझलच्या रेकॉर्ड्स आणि टेप्स फिल्मी गीतांच्या बरोबरीनं विकल्या जाऊ लागल्या होत्या. हिंदी वळणाच्या उर्दू गझलच्या रसरशीत बहराचे दिवस होते ते. पहिल्या लेखापासूनच राजाभाऊ वाईकर यांचं सादर गाजू लागलं. सदराच्या निमित्तानं आमच्या भेटीगाठी रोज होऊ लागल्या. राजाभाऊ वाईकर यांचं घर आमच्या कार्यालयालगत असणं पथ्यावरच पडले. आम्ही अधिक जवळ आलो. तेव्हा मी सडाफटिंग होतो, राजाभाऊ आणि वीणावहिनींनी माझं पालकत्व अघोषितरीत्या घेतलं आणि नंतर ते कायम निभावलं आणि अभिमानानं मिरवलं.

उर्दू आणि उर्दूमिश्रित गझल भारतात घराघरात पोहोचत असतानाच ती समजून घेण्यातील अडचण डॉ जरीना सानी आणि डॉ. विनय वाईकर यांच्या लक्षात आली. ही अडचण सोडवण्याच्या कल्पनेतून 'आईना-ए-गझल' हा भारतीय साहित्यातील संपूर्ण वेगळा ग्रंथ निर्माण करण्याचं काम त्यांनी हाती घेतलं. याच दरम्यान डॉ. जरीना सानी यांच्या आकस्मिक निधनानं निर्माण झालेल्या परिस्थितीत राजाभाऊ वाईकर यांचा एक वेगळाच पैलू भावला. 'आईना-ए-गझल' प्रकल्पाची जेमतेम रचना तयार झालेली होती, प्रकल्प म्हणून तो आकाराला यायचा होता. राजाभाऊ यांनी हे शिवधनुष्य मिळेल त्याची मदत घेत सामर्थ्यानं पेललं. त्यासाठी स्वत: अमित प्रकाशन सुरू केले. दिवसरात्र एक करून 'आईना-ए-गझल' हा शब्दकोश सिद्ध केला, तोही डॉ. जरीना सानी आणि डॉ विनय वाईकर अशा संयुक्त नावानं! प्रकाशनाचा अतिशय देखणा असा कार्यक्रम घेतला. चित्रा आणि जगजितसिंग यांना नागपूरला आणलं, त्यांच्या हस्ते प्रकाशन केलं. नंतर त्यांच्या गझल गायनाचा नजराणा पेश केला. नागपूरकर तृप्त झाले. महत्त्वाचं म्हणजे सहलेखक म्हणून डॉ. जरीना सानी यांचा मरणोत्तर त्यांनी राखलेला सन्मान राजाभाऊ किती उमद्या मनाचे आहेत याची अनुभूती देणारा होता. बहुसंख्येनं स्वार्थी झालेल्या समाजात वावरताना स्तंभित करणारा होता. पुढे ग्रंथाची जबाबदारी त्यांनी मंगेश प्रकाशनाकडे सोपवली.

उर्दू गझलमध्ये (डॉ. वाईकर यांच्या आग्रहानुसार गझल या तीन अक्षरी शब्दातील ग आणि झ या अक्षरांखाली नुक्ता आवश्यक!) येणाऱ्या शब्दांचा मराठी , हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषात अर्थ सांगणारा 'आईना-ए-गझल' हा एकमेव शब्दकोश आहे. सुमारे पावणे तीनशे पृष्ठांचा हा शब्दकोश असून त्यात  हजारपेक्षा जास्त उर्दू शब्दांचा अर्थ देण्यात आलेला आहे. एवढेच नाही तर त्यात पाच हजारांपेक्षा जास्त उर्दू शेर आहेत! या शब्दकोशासारखा दुसरा शब्दकोश अद्याप मराठी-हिंदी-इंग्रजी भाषेत निर्माण झालेला नाही इतका हा परिपूर्णत्वाकडे जाणारा आहे.

उर्दू गझल हा डॉ. विनय वाईकर यांचा ममत्वाचा विषय आयुष्यभर राहिला. शेवटच्या काळात त्यांना विस्मरण होऊ लागलं, पण अखेरपर्यंत ते गझलमध्ये आलेल्या कोणत्याही शब्दाचा अर्थ सांगत असत अशी आठवण त्यांच्या पत्नी डॉ. वीणा यांनी सांगितली. अखेरच्या काही दिवसांत त्यांच्या खोलीत गझलगायनाच्या टेप्स कायम मंद स्वरात सुरू ठेवण्यात आल्या होत्या. उर्दूतील अभिजात २७५ गझलांचा त्यांनी मराठीत केलेला 'गझलदर्पण' गझल प्रेमींसाठी अनमोल ठेवा आहे. 'गुलिस्तान-ए-गझल'मध्ये डॉ. वाईकर यांनी उर्दू गझलचा इतिहास शब्दबद्ध केलेला आहे. प्रदीर्घ मोठ्या आजाराला सामोरं जाण्याआधी डॉ. वाईकर यांनी मिर्झा गालिब यांच्या गझलचं मराठीत अर्थ सांगणारं 'कलाम-ए-गालिब' हे पुस्तक निगुतीनं पूर्ण केले. या पुस्तकाला कवी

गुलझार यांची प्रस्तावना आहे.

'आईना-ए-गझल' नंतर राजाभाऊ लेखनात मन:पूर्वक रमले. तीन युद्धांचा अनुभव गाठीला असणाऱ्या राजाभाऊंनी मग युद्ध कथांना हात घातला आणि मराठी साहित्याच्या प्रांतात 'रक्तरंग' व 'फौजी' अशा दोन वेगळ्या, कसदार कथासंग्रहांची भर पडली. एव्हाना आईना-ए-गझलची ख्याती मराठीसोबतच हिंदीतही पसरली. राजाभाऊंचं घर देशभरातून येणाऱ्या लेखक कलावंतांनी गजबजून गेलं. याच घरात रंगलेल्या जगजीतसिंग, विद्याधर गोखले, व.पु. काळे, सरदार जाफरी अशा एक ना अनेक दिग्गजांच्या मैफिली उत्तररात्रीपर्यंत रंगल्या. या मैफिलीत सहभागी होण्याचा आनंद मलाही राजाभाऊ आणि वीणावहिनींनी मुक्तपणे लुटू दिला. राजाभाऊ मैफिलीत रंगणारे आणि रमणारे होते तरी अबोल होते. त्यांचं वागणं मोकळं-ढाकळं होतं तरी सर्वांसोबत ते खुलत नसत, त्यांच्या मोकळेपणातही स्पष्ट न जाणवणारा खानदानी चोखंदळपणा होता. मैफिलीत म्हणा की सार्वजनिक वावरात; बहुतांश वेळा त्यांची भूमिका मग्न रसिकाची असे. कमी बोलणं आणि जे काही बोलायचं ते मोजकं, ठाम साधार असे. अनेकांना ते 'रिजर्व्ह' वाटत तर अनेकांना आत्ममग्न. प्रत्यक्षात मात्र आपुलकीचा स्वर जुळलेल्यासोबत ते खूप खुलत. त्यांचा हा खुलण्याचा पैलू माझ्या आणि मंगलच्या वाट्याला नेहमीच यायचा. ( विस्मरण सुरू झाल्यावरही ज्या काही मोजक्या आप्त-मित्रांचं स्मरण त्यांना होतं त्यात मंगल आणि मी होतो.. इतका त्यांचा आमच्याशी जीव जुळलेला होता.) केव्हाही ते आमच्याकडे येत आणि 'मंगुजी, जरा चाय हो जाय' असं म्हणत बैठक ठोकत. मी घरी नसेन तर मंगल चहा करेपर्यंत आमच्या डॉगीशी गप्पा मारणंही मन:पूर्वक चालत असे. आमच्यातल्या बहुतांश गप्पांची सुरुवात 'जरा सुनो' असं म्हणत ते काहीतरी नवीन लिहिलेल्या वाचनाने करत, मात्र आपल्याकडून त्यावर प्रतिक्रिया मिळण्याची त्यांना घाई नसे. गप्पा म्हणजे अन्य कोणाच्या उखाळ्या-पाखाळ्या नाहीत किंवा कोणाची निंदा-नालस्ती नाही की अन्य कोणाच्या सन्मानाबद्दल उसासे नाहीत. अत्युत्तम या निकषावर बसणारी आर्थिक परिस्थिती असणाऱ्या राजाभाऊंना दोन-तीन मित्रांनी चांगलीच टोपी घातली, पण त्यांचा विषय निघाला तरी राजाभाऊंनी प्रतिकूल टीका-टिप्पणी केल्याचं स्मरत नाही. माणसातल्या चांगलेपणावर त्यांचा विश्वास होता. 'ही टोपी' मला कळली त्यानंतर एकदा मी त्याबद्दल टोकलं तर 'जाने दो' ही त्यांची प्रतिक्रिया. उमदेपणाचा हा कळस होता, पण राजाभाऊंनी स्वत:ची आदब कधी सोडली नाही. दोन व्यक्तींबद्दल त्यांची मतं प्रतिकूल होती पण फारच क्वचित ती त्यांनी प्रकट केल्याचं स्मरतं.

'रक्तरंग'नंतर राजाभाऊंना त्यांच्यातील कथनशैलीचा शोध लागला. अत्यंत चोखंदळ राहणी, आदबशीर वर्तन आणि रुबाबदार व्यक्तिमत्त्व याला पूरक राजाभाऊ मैफिलबाज होतेच, अनुभवांचा मोठा साठा त्यांचाकडे होता, रसाळ आणि फुलत जाणारी वाणी होती. डॉक्टर असल्यानं समोरच्या माणसाच्या मनाचा वेध, कल आणि संयम याचा ठाव घेण्याचा आवाका होता, महत्त्वाचे म्हणजे सतत स्वत:चा शोध घेण्याच्या वृत्तीमुळे स्वत:च्या मर्यादाही चांगल्या ठाऊक होत्या. मर्यादा ठाऊक झाल्या की कुठे थांबावे हे अन्य कोणी सांगावं लागत नाही. त्यामुळे कथाकथनात ते चांगलेच रुळले. ते एक व्रत झालं त्यांचं बराच काळ. यातही उल्लेखनीय बाब म्हणजे घरची आर्थिक स्थिती संपन्न असल्यानं कथाकथन काही राजाभाऊंना द्रव्यप्राप्तीचं साधन नव्हतं. अनेकदा तर स्वत:च्या खिशाला खार लावून युद्ध कथाकथनाचे त्यांचे कार्यक्रम सुरू असत. अनेकदा आयोजक राजाभाऊंच्या आदबशीर वागण्याचा गैरफायदा घेत. एकदा ते औरंगाबादला कथाकथन करण्यासाठी आले होते. मला ते कार्यक्रम सुरू होण्याच्या काही वेळ आधी कळलं आणि मी थेट सभागृहावर गेलो. थोड्या वेळानं राजाभाऊ चक्क ऑटो रिक्षाने आले, ते काही मला आवडलं नाही. (राजाभाऊ कायम स्कूटरवर फिरत तरी घरी कारचा ताफा होता, ते आणि त्यांचे कुटुंबीय वैपुल्यानं विमान प्रवास करत हे मला ठाऊक होतं) कार्यक्रम संपल्यावर ते जिथे उतरले होते तिथे गेलो तर धक्काच बसला. कारण राहण्याची ती व्यवस्था अगदीच सुमार होती. अक्षरश: सामान उचलून त्यांना घरी घेऊन आलो तर येताना 'मंगुजी को क्यों तकलीफ?' असा सूर त्यांनी लावला. अर्थात राजाभाऊ आल्यानं आम्हाला जो काही आनंद झाला तो मनापासून होता. दुसऱ्या दिवशी त्यांची जालन्याला जाण्याची सोय चक्क साध्या एसटीनं. मग वैतागून मी त्यांना कारनं जालन्याला सोडून आलो, प्रवासभर राजाभाऊंचं 'लोकांपर्यंत चार शब्द पोहोचतात हे जास्त महत्त्वाचं, बाकी चलता है' हेच पालुपद उमदेपणानं सुरू.

विषय निघालाच आहे तर राजाभाऊंच्या सालस वागण्याचा आणखी अनुभव सांगायला हवा. लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीच्या संपादकपदी मी आलो. एक दिवस संपादकीय बैठक खूप वेळ रेंगाळली. बैठक संपल्यावर व्हिजिटर्स किती, कोण-कोण आहेत विचारलं तर इतर नावांसोबत डॉ. वाईकर हे नाव कळले. मी ताबडतोब उठून बाहेर आलो आणि बघतो तर काय, राजाभाऊ काही वार्ताहरांसोबत गप्पात रंगलेले. 'इधरसे जा रहा था, सोचा चाय पी लु आधी प्याली' असं म्हणत राजाभाऊ माझ्यासोबत आले. एवढा मोठा माणूस आपली वाट पाहत बसतो हे मला फारच खटकलं. 'आधी फोन केल्याशिवाय येऊ नका प्लीज' असं त्यांना सुचवलं. पुन्हा राजाभाऊ आले तर त्यांना अडवू नका सरळ आत सोडा अशा सूचना दिल्या. पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. बैठक सुरू असल्यानं राजाभाऊ बाहेरच बसून राहिल्याचं नंतर दोन वेळा घडलं. सांगितलं तरी ते आत जात नाहीत असं मला सांगण्यात आलं. मी सरळ राजाभाऊंच्या घरी गेलो आणि त्यांना

रागावलो. 'अरे, संपादक आहेस तू. कामात असतोस, मैं बेकार आदमी' असा बचाव त्यांनी केला. मग मात्र मी, फोन केल्याशिवाय तर सोडाच माझ्या ऑफिसला यायचं नाही. काही असेल तर फोन करायचा, मी घरी येईन असं निक्षून बजावून कसलं रागावून सांगितलं. अर्थात याचा काही उपयोग झाला नाही तो नाहीच!

'आईना-ए-गझल' आणि 'रक्तरंग'-नंतर माफक वैद्यक व्यवसाय करावा आणि लेखनात रंगून जावं हा राजाभाऊंचा दिनक्रमच झाला. आधी युद्धातील आणि मग वैद्यक व्यवसायातील आलेल्या विविधांगी अनुभवांवर आधारित कसदार आणि वेगळी अनुभूती देणाऱ्या विपुल कथालेखनासोबतच त्यांनी एक आणि दोन अंकी नाट्यलेखन, उर्दूतील उत्तम साहित्याचा मराठीत अनुवाद , वृत्तपत्रांसाठी भरपूर स्तंभलेखन , टीव्हीवरील हिंदी आणि मराठी मालिकांसाठी संवाद-लेखन अशी चौफेर मुशाफिरी केली, आपला वेगळा ठसा उमटवला. असं असलं तरी त्यांचं मन कायम उर्दू गझल आणि युद्धकथांतच रमलं. मोठ्या आजाराला सामोरं जाण्याआधी मिर्झा गालिबच्या गझलांचा मराठी अनुवाद करण्याचा प्रकल्प त्यांनी याच निष्ठेनं हाता-वेगळा केला. उर्दू गझलसंबधी त्यांनी लेखन सुरू केलं तेव्हा तो मराठीत नवीनच प्रयोग होता आणि त्याला राजाभाऊंच्या व्यासंगाचा आधार होता. नंतर या विषयावर लेखन करण्याची मोठी टूम आली, बहुसंख्येनं अत्यंत सुमार असणाऱ्या या लेखनाची वाहव्वा मार्केटिंगच्या तंत्रानं झाली आणि ज्या जाणकारांचं अस्सल लेखन मागे पडलं त्यापैकी एक राजाभाऊ वाईकर. एक मात्र खरं , डॉ.वाईकर हे प्रकाशकानं किंवा स्वत: मार्केटिंग केलेले लेखक नव्हते. असं काही करणं हा त्यांचा पिंड नव्हता आणि मार्केटिंग, प्रसिद्धी वगैरेसाठी लांगुलचालन करावं, लांड्यालबाड्या कराव्या, कोणाचे उंबरठे झिजवावे, साहित्य संघाच्या वर्तुळात कंपूबाजी करावी हा त्यांचा स्वभावच नव्हता. साहजिकच, मोजके अपवाद वगळता पुरस्कार आणि सन्मानाच्या वर्षावापासून राजाभाऊ वंचितच राहिले. खरं तर 'आईना-ए-गझल' हे त्यांचं मराठी-हिंदी-इंग्रजी साहित्याला मोठे योगदान. जाणकार तसंच वाचकांकडून 'आईना..' वैपुल्यानं स्वीकारलं गेलं, पण खुल्या दिलाने त्याला मान्यता देण्याचा दिलदारपणा साहित्य व्यवहाराच्या कर्त्या-धर्त्यांकडून दाखवला गेला नाही, हेही तेवढंच खरं... अर्थात त्याबद्दल राजाभाऊंना ना खेद होता ना खंत. उमदेपणाच्या कोंदणात जगण्याला बसवून हा माणूस कायम आदबशीर वावरला. राजाभाऊंचा हा उमदेपणा दुर्मिळ आहे आणि म्हणूनच कायम स्मरणात राहणारा आहे.


**- प्रवीण बर्दापूरकर**

९८२२०५५७९९

praveen.bardapurkar@gmail.com



# काळिजगुंफा - सदानंद डबीर




'काळिजगुंफा' या संग्रहाद्वारे डबीर ग़ज़लांची एक वेगळी तरल शैली रुजवू पहात आहेत; जी भौतिकातून दार्शनिक चिंतनाकडे झेपावत आहे. या संग्रहातील अनेक ग़ज़ला माझ्या या प्रतिपादनाची साक्ष देतील.

- डॉ. राम पंडित

**मूल्य ७५ रु. ● सवलतीत ५० रु.**

# नोबेलनगरीतील नवलस्वप्ने २०१२

## सुधीर-नंदिनी थत्ते




नोबेल पुरस्कार विजेत्या शोधांची गोष्टीरूपाने यथार्थ वैज्ञानिक माहिती देणारा सतरा वर्षे चाललेला जगातला एकमेव उपक्रम

**मूल्य ८० रु. ● सवलतीत ५० रु.**

# दुसरा हात देण्यासाठी!

**आनंद गुप्ते**

खरं पाहता पद्मश्री डॉ. भवरलाल जैन या माणसाला 'समाजसेवा' अशासारख्या बोजड शब्दांनी कधी झपाटलंच नाही. तरी जिला समाजसेवा हेच नाव देता येईल अशी बरीच कामं त्यांच्या हातून झाली आहेत, होत आहेत आणि होतही राहतील. त्यांच्या अशा वागण्यामागे कोणतीही भलीमोठी लांबलचक कारणमीमांसा वगैरे नाही. त्यांनी स्वत: याचं कारण फक्त एकाच शब्दात दिलंय; ते म्हणजे 'संस्कार.'

पाण्याच्या दुर्भिक्षेपायी, कंटाळून आणि नाइलाजानं हा चोरडिया-जैन परिवार जोधपूरजवळील 'आगोळाई' या मारवाडातील खेड्यातून मध्यप्रदेशमार्गे महाराष्ट्रात आला आणि खानदेशात स्थिरावला. सुमारे चार पिढ्यांपूर्वी आणि एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीअखेरीस हे स्थलांतर झालं. या आधीच त्यांच्या नात्यागोत्यातील, गावातील, ओळखीच्या लोकांनी हा मार्ग पत्करलेला होता. त्यांच्याच थोड्याफार आधारानं हा परिवार खानदेशात रुजला. अंगी कसलीही हुन्नर नाही, पण कष्टाला मागे नाही, म्हणून या परिवारातील सदस्यांनी कष्ट, कष्ट आणि कष्ट हा मंत्र धरला. अक्षरश: शेतांवर मजुरी केली. पै अन् पै वाचवणं, साठवणं व कामी आणणं हे तर रक्तातच होतं. मारवाडमधील जगणं फारच कष्टाचं असतं त्यामुळे ही माणसं, कुटुंबं, परिवार स्वाभाविकपणे एकमेकांना 'धरून' राहतात. 'सहकार्य' हा इथं अत्यंत तोकडा, अपुरा शब्द आहे. अशा प्रकारे राहिलेल्या, वाढलेल्या माणसांचं वागणं खानदेशसारख्या सुपीक, सुखी, संपन्न खेड्यात अगदी अल्पकाळातच एकजीव झालं यात नवल नव्हतं. अडीअडचणीला धावून जाणं, आपल्या घासातला घास प्रेमानं देणं, वागण्या-बोलण्यात जिव्हाळा असणं यामुळे हा परिवार गावात आदरास पात्र झाला. सुमारे १५-२० वर्षांपूर्वीचीच म्हणजे १९९०-९५ दरम्यानची गोष्ट. भवरलालजींची म्हणजे भाऊंची आई तेव्हा हयात होती आणि वाकोद सोडून भाऊंकडे राहत होती. तिची पंच्याहत्तरी उलटली होती. वाकोदचं राहणं सुटूनही बरीच वर्षं झाली होती. वाकोदमधल्या बायाबापड्या आता बाळंतपणं करायला थेट जळगावच्या दवाखान्यात भरती होत होत्या. अशी एखादी बाई जळगावात जर बाळंतीण झाली तर अत्यंत प्रेमानं, आपुलकीनं, हक्कानं त्या बाळंतविडा घेऊन जात. बऱ्याचदा त्या बाळंतीणबाईशी त्यांची पहिलीच भेट असे. पण केवळ 'वाकोद'ची एवढाच धागा त्यांना पुरे असे. हीच ती 'नाळ' जी भाऊंनी कधीही सोडली नाही. हेच ते 'संस्कार' जे भाऊंनी उरापोटी धरून ठेवले. देवानं माणसाला 'दोन हात' हे कशासाठी दिलेत? भाऊ म्हणतात, 'एक जेवण्यासाठी अन् दुसरा देण्यासाठी!' शिवाय 'देण्यामुळे देणाऱ्याचं कधीच संपत नाही' असंही त्यांना वाटतं. म्हणून भाऊ ज्यांना आर्थिक मदत देतात त्यांचं तोंड ते कधीही पाहत नाहीत. याचं कारण ते सांगतात, की जर मला तो माणूस चेहऱ्यानं, नावानिशी माहीत झाला तर त्याच्याशी वागताना माझ्या मनात अहंगंड उत्पन्न



भवरलाल जैन

होण्याचा धोका असतो. 'याला मी मदत केलीय, तो माझा मिंधा आहे' अशा भावना माझ्या मनात उत्पन्न होऊ शकतात. अशानं मदत देण्याच्या पवित्र कामाला गालबोट लागू शकतं. म्हणून ते नकोच व्हायला. मदत ही पूर्णपणे नि:स्वार्थ हेतूनंच व्हायला हवी, म्हणून अशी बंधनं स्वीकारायलाच हवी असा भाऊंचा दृष्टिकोन आहे.

वाकोद या त्यांच्या जन्मगावातल्या सुधारणा करण्यामागचा त्यांचा दृष्टिकोन नक्कीच जाणून घेण्यासारखा आहे. भाऊंनी वारंवार, दरवर्षी ग्रामसभा घेऊन त्यांचे विचार लोकांना समजवून सांगितले. गावात गटबाजी नको, राजकीय शत्रुत्व नको, गावात जातीयता-धार्मिक तेढ नको. गावाच्या विकासकामांमध्ये गावातील लोकांचाच सक्रिय सहभाग हवा. आर्थिक सहभाग हवा. गावातील प्रश्न सोडवण्यासाठी कोणत्याही त्रयस्थाची, पोलिसांची,


बळाची, बेकायदेशीर मार्गांची मदत नको. शासकीय मदत हक्कानं जरूर घ्यावी; पण ती मिळण्यासाठी भ्रष्टाचार, लाचलुचपत अजिबात नको. शासनाच्या विलंबानं कामं रखडली तर ग्रामपंचायतीला भाऊ स्वत:चे पैसे कर्जाऊ द्यायला तयार असतात. मात्र हे पैसे ग्रामपंचायतीनं परत करायला हवेत. गावाला कोणतीही गोष्ट फुकटात मिळता कामा नये. नाहीतर ती व तशीच सवय लागते. विकास हवा पण आत्मनिर्भरता हवीच.

याच जोडीनं भाऊंनी ग्रामसुधार कार्यक्रमातील महिलांचा सहभाग वाढण्यावर भर दिला. व्यसनमुक्ती-साठी प्रचार केला. या प्रत्येक कामात त्यांना कधी यश तर कधी अपयशही आलं; पण भाऊंनी जिद्द सोडली नाही. ग्रामसभेत गावकरी खुलेआम विरोधी मत नोंदवण्याइतके धीट झाले. न घाबरता नावानिशी उदाहरणं देऊन आरोप-प्रत्यारोप करू लागले. आता गावातील महिलांची एकजूट करून गावापुरती दारूबंदी करण्यासाठी प्रयत्न चालू आहेत. सौर दिवे लागले, पाण्याची पाईपलाईन झाली, आठवडे बाजारासाठी ओट्यांचं बांधकाम झालं, शाळेची भव्य इमारत झाली, हॉस्पिटल कॉम्प्लेक्स पूर्ण झालं, नदीला घाट झाला, राममंदिर झालं, ग्रामपंचायतीच्या कामांचं संगणकीकरण झालं, तरी अजूनही बरीच कामं होणं बाकी आहे. लोकशाहीच्या प्रथेनुसार ठरावीक काळानं गावाला कामांचा, यशापयशांचा लेखाजोगा छापील स्वरूपात घरपोच दिला जात होता. रस्त्याची रुंदी सर्वत्र एकसारखी राहील असं त्यांनी जाहीर केलं होतं. काही ठिकाणी लोकांनी स्वत:हून सहकार्य करून आपापली जुनी अतिक्रमणं तोडून काढून टाकली पण हट्टी लोकांनी स्वत:ची अतिक्रमणं काढण्याचं नाकारलं. जिथे अशी वेळ आली तिथे रस्ता अर्धवटच सोडून त्यापुढचं काम चालू केलं. परंतु गावात होणाऱ्या नाचक्कीनं म्हणा, कालांतरानं अशा आडमुठ्यांनी लोकलज्जेस्तव का होईना, स्वत:च स्वत:ची आक्रमणं तोडली. हा उताम गांधीवाद होता. भाऊंमध्ये गांधींच्या शिकवणीवर असलेली श्रद्धा किती रुजलेली आहे हेच यावरून सिद्ध होतं.

शिक्षणाच्या संबंधात भाऊंना असलेली आस्था फारच डोळस आहे. याबाबतीत तरी ते स्वत:च्या मतांना, हट्टांना, शिस्तीला मुरड घालून प्रसंगी भरपूर पदरमोड करून मुलाबाळांच्या शिक्षणाची सोय करून देतात. वाकोदच्या शाळेचा एसएससीचा निकाल ०% वरून ९६%पर्यंत त्यांनी ज्या चतुराईनं खेचत नेला, त्याला तोड नाही. गैरप्रकारांनी, भ्रष्टाचारांनी, पैशांनी शिक्षणक्षेत्रात घातलेल्या नंग्यानाचानं सर्वात जास्त अध:पतन जर कोणाचं झालं असेल तर ते मुलांच्या पालकांचं. त्यामुळे शिक्षणाचा स्तर उंचावायचा असेल, शिक्षणाची गुणवत्ता सुधारायची असेल तर सर्वप्रथम पालकांची मनं वळवायला हवीत. तेच नेमकं फार अवघड आहे. भाऊंनी हे तर केलंच, त्याचबरोबर शिक्षकांच्या दृष्टिकोनातही खूप फरक घडवून आणला. विद्यार्थ्यांच्या बाबतीत असा त्रास फार झाला नाही. भाऊंनी ज्या चिकाटीनं या प्रश्नाची पाठ धरली ते विशेष होतं. मूळ नीतिमत्ता सुधारणं हे नुसतं सैद्धांतिकच नव्हे तर फार अवघड असतं. इथंही भाऊंची गांधीगिरीच कामी आली.

आंतरराष्ट्रीय दर्जाचं 'अनुभूती स्कूल' जळगावमध्ये स्थापन करून भाऊंनी शिक्षणक्षेत्रात एक नवं पाऊल टाकलं. शिक्षणाची गुणवत्ता, दर्जा, संस्कारांवरचा भर, आधुनिकता, तंत्र या शिक्षणाच्या सर्व अंगांचा विचार करता, भारतातील इतर सर्व दर्जेदार आंतरराष्ट्रीय शाळांपेक्षा 'अनुभूती' निश्चितच वरचढ आहे. याचं खरं कारण यात शिक्षणाच्या नावाखाली 'गुंतवणूक' करून जास्तीत जास्त 'परतावा' मिळवण्याचा प्रयत्न अजिबात होत नाही. यासाठी फारशा पुराव्याची गरज नाही. स्वत: भाऊ दर रविवारी न चुकता कमीत कमी दोन तास सकाळी अनुभूतीमधील सर्व वयाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींशी थेट संवाद साधतात. 'दादाजीं'च्या प्रेमानं, ममतेनं, अधिकारानं ते असा संवाद साधतात. संस्कार हे एका दिवसात, एका भाषणातून होत नसतात. त्यामध्ये जे सातत्य लागतं ती चिकाटी इथं आहे. 'होनहार बिखान के होत चिकने पात'!

आरोग्यासाठी भाऊंचं लक्ष चौफेर असतं. दारी आलेल्या गरजूंना अपेक्षित आर्थिक मदत करणं हे तर नित्याचं असतं. दुर्गम, दूरवरच्या ठिकाणी आरोग्य शिबिरं घेणं हेही नित्याचंच. या शिबिरांचा गरजूंना तर खूपच उपयोग होतो, त्याहीपेक्षा अशी सामाजिक सेवा करण्यासाठी स्वत:चा वेळ, श्रम देऊन समाधान मिळवू पाहणारे स्वयंसेवक तयार होतात ही खरी कमाई. कारखान्यांमधील सहकार्यानं सहकारी बांधवांच्या आरोग्य गरजा पूर्ण करणं ही तर कायदेशीर जबाबदारीच आहे. तथापि त्याही पलीकडे जाऊन आणि मानवी दृष्टिकोनातून पाहून सहकाऱ्यांनी समोर न आणलेले आरोग्यप्रश्न त्यांनी सोडवले आहेत. तिथे प्रश्न आपुलकीचा, प्रेमाचा, विश्वासाचा असतो.





# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथयात्रा क्षणचित्रे

नागपूर दीक्षाभूमी




गोविंदबाग, माळेगाव






अजित पवार








सुप्रिया सुळे



भांडूप






पुणे


विक्रोळी


माटुंगा


दादर, चैत्यभूमी


दापोली


खेड


गुहागर


अहमदनगर
YASHWANTRAO CHAVAN PRATISHTHAN / GRANTHALI


संगमेश्वर
भव्य ग्रंथप्रदर्शन व
सवलतीत विक्री


कात्रज


ठाणे
वाचक दिन २०१२


लांजा


अमरावती


रत्नागिरी


राजापूर


पाटण


सातारा



विद्यार्थ्यांसह 'दादाजी'

आरोग्याचे प्रश्न निर्माणच होऊ द्यायचे नसतील तर सुदृढ शरीर कमावायचा प्रयत्न व्हायला हवा. त्यासाठी खेळांना प्रोत्साहन देणं गरजेचं असतं. भाऊंनी खेळ, खेळाची मैदानं, खेळांचं साहित्य, खेळाडू, खेळांचा प्रचार-प्रसार याहीपलीकडे जाऊन आधुनिक तंत्रानं खेळांचं नियोजन, खेळांच्या संघटना यामध्येही लक्ष घातलं. त्यामुळे त्यामधलं राजकारण कमी होतं व प्रत्यक्ष खेळ वाढतो. खिलाडूवृत्ती वाढते.

माणसाचं शरीर निरोगी आणि बलवान झालं तरी मन तसं होईलच असं नव्हे. त्यासाठी हवा असतो कलाविष्कार, गायन, वादन, नर्तन, नाट्य, लोककला अशा विविध आविष्कारांना भाऊंचा सक्रिय व भक्कम आर्थिक पाठिंबा असतो. जळगावातील कलेच्या कोणत्याही प्रांतातल्या प्रस्थापित संस्थांना भाऊ एक आधारस्तंभ वाटतात ते यामुळेच. त्यामुळे जळगावातलं कलाक्षेत्र बाराही महिने गजबजलेलं राहतं, जिवंत राहतं.

'अनुभूती' स्कूल ही एक पंचतारांकित शाळा आहे अशी टीका ऐकून भाऊंनी जळगाव शहरात 'अनुभूती-२' ही एक नवीन शाळा सुरू केली. फक्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या पाल्यांनाच इथं प्रवेश मिळतो. त्यासाठी शासनाचं पिवळ्या रंगाचं रेशनकार्ड प्रमाण मानलं जातं. इथल्या शिक्षणाचा स्तर कटाक्षानं सर्वोत्तम ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. दोन्ही अनुभूती शाळांमध्ये देवाण-घेवाणही चालते.

जैन हिल्स परिसर प्रदूषणमुक्त आहे. अशा आरोग्यदायी वातावरणाचा फायदा घेऊन इथल्याच एका टेकडीवर भाऊंनी एक निसर्गोपचार केंद्रही उघडलंय. तिथे विशेष अनुभवी व प्रशिक्षित डॉक्टरही असतात. हे केंद्र जरूर त्या सर्व साधनांनी, यंत्र-तंत्र-सुविधांनी सुसज्ज आहे.

सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई जळगावच्याच. त्यांचं काव्य अजरामर आहे. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी भाऊंनी एका स्वतंत्र न्यासाची संस्थापना केली आहे. यामधून उत्तमोत्तम पुस्तकांना, ग्रंथांना अनुदान, पुरस्कार दिले जातात. लेखक-कवींचं संमेलन, मेळावे, चर्चासत्रं घेतली जातात. उत्तमोत्तम साहित्याची, साहित्यिकांची कदर केली जाते. म्हणूनच जैन हिल्सवर साहित्यिकांची, बुद्धिवंतांची वर्दळ वाढते.

'गांधीतीर्थ' अर्थातच गांधी रिसर्च फाउंडेशनची (GRF) स्थापना म्हणजे भाऊंच्या आजवरच्या कार्याचा मुकुटमणीच. जैन हिल्सवरच्या निसर्गरम्य, पर्यावरणानं पुरेपूर, प्रदूषणमुक्त जागी हे स्वप्न साकारलं आहे. भव्य अशा सुंदर इमारती, लाल जोधपुरी दगडातलं कलात्मक बांधकाम, ऐसपैस मोकळ्या जागा, बागा, हिरवळी पाहून येणारी मंडळी खूषच होतात. अत्याधुनिक, टच स्क्रीनसारख्या तंत्रांनी हे संग्रहालय परिपूर्ण आहे. महात्मा गांधींचं संपूर्ण आयुष्य, त्यामधील घटना, त्यातील वळणं, त्यांची भाषणं, त्यांची साहित्यसंपदा, त्यांचा पत्रव्यवहार अशा अनेक गोष्टी इथं ठासून भरलेल्या आहेत. गांधींवर संशोधन, अभ्यास करण्यासाठी इथं प्रचंड साधनसामुग्री उपलब्ध आहे. लहानमोठे अभ्यासक्रमही घेतले जातात. प्रमाणपत्र, पदविका, पदव्या, पदव्युत्तर सन्मान अर्हता मिळवण्याची सोय आहे, तशी भोजन आणि निवासव्यवस्थाही आहे. गांधी साहित्य, खादी, ग्रामकला, हस्तकला विक्रीकेंद्रही आहे.

इतक्या साऱ्या पसाऱ्यांमध्ये राहून, रमून जाऊनही भाऊ स्वत:चा उद्योगधंदा नफ्यात चालवतात व मिळवलेला पैसा सन्मार्गी लावतात. चारही मुलं ही चौरंगाच्या चार खांबांसारखी आधारस्तंभ बनून वरचा पवित्र डोलारा सांभाळतात. वाढवतात.

एक हात जेवणासाठी तर दुसरा देण्यासाठी... देत राहण्यासाठीच!

**– आनंद गुप्ते**

## वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके

# जेनेटिक्स कशाशी खातात?




**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**

### डॉ. उज्ज्वला दळवी

गेल्या अर्धशतकात जेनेटिक्स या शास्त्राची प्रगती फार झपाट्याने झाली आहे. शाळेनंतर जे जीवशास्त्र शिकले नाहीत त्यांना या जनुकशास्त्राबद्दल कुतूहल वाटत असतं. 'ऊ्छअ म्हणजे काय?', 'ते वापरून गुन्ह्यांचा तपास कसा करतात?', 'आनुवंशिकतेचा, स्वाईन फ्लूचा, वार्धक्याचा किंवा कॅन्सरचा ऊ्छअशी काय संबंध?', 'जेनेटिक इंजिनीयरिंग, ईं-वांगं म्हणजे काय?', 'जनुकशास्त्राशी सर्वसामान्य माणसाचा काय संबंध?' या साऱ्या प्रश्नांची आकृत्यांसह समर्पक उत्तरं या पुस्तकात दिली आहेत. सोबत नऊवारी साडीचा पिळा, धावदोरा, गाण्यातल्या ताना यांसारखे रोजच्या वापरातले दाखले दिल्यामुळे नवंच शास्त्र शिकताना करमणूकही होते. विषय अधिक चांगला समजतो. हे पुस्तक वाचून बुद्धिमान आणि जिज्ञासू वाचकांच्या मनातून जनुकविज्ञानाबद्दलची भीती आणि अढी दूर होईल; त्यांना नव्या शोधांबद्दल योग्य निर्णय घेणं जमेल आणि या सर्वव्यापी शास्त्राचा योग्य तो वैयक्तिक फायदाही करून घेता येईल.

– डॉ. उज्ज्वला दळवी

---

# नाही चिरा नाही पणती




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

### स्मिता भागवत

इतिहास केवळ तारखांचा रोजमेळ नसतो. संवेदनशील मनात, अतीतात दडलेल्या समर्थ महानुभावांविषयी आदराची ज्योत असते-असायला हवी. इतिहास आपली पाळेमुळे! मुळे छाटली तर बॉन्साय निर्माण होतात. पुढच्या पिढीचे व्यक्तिमत्त्व चहू अंगानी फुलले पाहिजे, असे वाटत असेल तर मुळे छाटली जाणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी, असे मला मनापासून वाटते म्हणून हा लेखनप्रपंच.

इतिहासाच्या पानावर सोनेरी अक्षरात उल्लेख व्हावा, अशा कित्येक समर्पितांची, साधी जाणीव आजच्या पिढीकडे नसली तर ते ती पुढच्या पिढीस कशी देणार? या अवस्थेवर मात करून नव्या पिढीस अनोख्या आनंदाची किंचित चुणूक मिळवून देणे व महानुभावांना मानवंदना देणे, हे या पुस्तकाचे प्रयोजन आहे. इतिहासात महत्त्व न लाभलेल्या – काही इतिहासात महत्त्व मिळालेल्या महानुभावांच्या, पण अंधारात राहिलेल्या घटनांच्या त्यात समावेश आहे.

– स्मिता भागवत

# वैद्यकीय ज्ञान आणि सामाजिक योगदान

**राजीव जोशी**

नुकतीच वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेले जागतिक ख्यातीचे न्यूरोस्पायनल सर्जन डॉ. पी.एस. रामाणी आपल्या व्यस्त वेळापत्रकातही विद्यादान करून शिष्य घडवण्याचे आणि शालेय विद्यार्थ्यांना सुविधा देण्याचे कार्य हे मोठ्या निष्ठेने करताहेत. त्यांचे काम, दानाचे महात्म्य सांगणारी त्यांची ही खास मुलाखत...

प्रश्न – सर, आपण विविध प्रकारे सामाजिक सेवा करत आहात, आपल्या देश–परदेशातील व्यस्त शेड्युलमधून हा वेळ कसा काय काढता?

डॉ. रामाणी – तशी समाजसेवा मी वेगवेगळ्या माध्यमांतून करतो. माझ्या गावासंदर्भात मी कोणत्या प्रकारे करतो हे सांगायचे झाले तर बुद्धी–शक्ती देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करतो. मुलांसाठी निबंधस्पर्धा, बालकांसाठी खेळण्यांचा संग्रह, तरुणवर्गासाठी अद्ययावत व्यायामशाळा, महिलांसाठी एकत्र येण्याची सोय त्याद्वारे कलागुणांचे संवर्धन. ह्याखेरीज मॅरॅथॉनचे आयोजन, व्याख्यानांचे आयोजनही करत असतो. गोव्यातील मुलांना वर्षातून एकदा मुंबई भेटीसाठी आणतो. मुंबईतील महत्त्वाची स्थळे दाखवतो. उदाहरणार्थ– नेहरू सायन्स सेंटर इत्यादी. त्यांना माझ्या घरी जेवण देतो. ह्या कामी माझ्या पत्नीचा मोलाचा सहभाग असतो. (हा उपक्रम गेली १५ वर्षे चालू आहे.) माझ्या व्यावसायिक–वैद्यकीय क्षेत्राबाबतचे माझे योगदान हे वेगळ्या प्रकारचे आहे. १९८५ साली, मी सायन इस्पितळात असताना, 'प्लीफ' ही शस्त्रक्रिया पद्धती शोधली, तेव्हापासून आजतागायत आरोग्यशिबिरे घेतो आहे. (पूर्वी मी साधने घेऊन छोट्या–मोठ्या शहरांत जात असे) पुस्तकापलीकडचे प्रॅक्टिकल अनुभव विद्यार्थ्यांना मिळणे हे आवश्यक आहे म्हणून मी शस्त्रक्रिया करत असताना ती पाहायला, त्यात सहभाग घेण्यासाठी विद्यार्थ्यांना बोलावतो. देशा–विदेशातील विद्यार्थी येतात. तसेच मी अनेक परदेशांत जाऊन डॉक्टरांसाठी वर्कशॉप्स घेतो. पाकिस्तान, बांगलादेश व नेपाळ अशा देशांत मी जातो.

ह्याशिवाय मेक्सिको, जपान, मलेशिया, इंडोनेशिया, आफ्रिका व अरबांच्या देशांत जाऊन विद्यादानाचे काम करतो. मला वाटते, स्कूल फॉर ट्रेनिंगची तेवढीच आवश्यकता आहे. तुमच्याकडे टेक्स्ट बुक्स असतात, आता तर काय इंटरनेटवरून बरीचशी माहिती मिळू शकते. तरी ज्ञान ग्रहण करण्यासाठी गुरूच्या/तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते. शस्त्रक्रिया दाखवणे, शिवाय त्यांच्याकडून करवून घेणे, शवावर प्रात्यक्षिक करायला लावणे यातून मुलांना 'हॅण्डस ऑन' म्हणतात तसा अनुभव मिळतो. जे शिकलेले असते ते पुस्तकी ज्ञान प्रत्यक्षात अमलात आणणे, सराव करणे हे काम माझ्या मार्गदर्शनाखाली होते. माझ्याकडील सर्व ज्ञान व अनुभव, हातचे राखून न ठेवता, मी शिष्यांना देतो.

परदेशातील डॉक्टर विद्यार्थी इथे येतात. दोन महिने राहतात. त्यांना मी एसी फ्लॅटमध्ये ठेवतो. राहण्या–खाण्याची व्यवस्था करतो. त्यांना दिवसभर माझ्याबरोबर ठेवतो. लेक्चर्स, शस्त्रक्रिया आणि रिसर्च पेपर्स अशा त्रिविध पद्धतीने त्यांचे ज्ञानग्रहण चालू असते. जाण्याआधी त्यांना रिसर्च पेपर्स द्यावे लागतात. मी शिकवून प्रवीण झालेले शिष्य नवीन शिष्यांना ट्रेनिंग देतात, त्यामुळे गुरू–शिष्य परंपरा साखळी पद्धतीने चालू राहते. अशा प्रकारे अधिक तज्ज्ञ डॉक्टर तयार होणे ही काळाची गरज आहे. कारण स्पाइनचे दुखणे हे जागतिक आहे. मात्र पाश्चात्त्य देशांत 'अवेरनेस' हा आधी आला, आपल्याकडे नंतर. मी तो प्रचलित केला! अशा रीतीने वैद्यकीय शाखेतील पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मी ज्ञानदानाने घडवतो, असे प्रात्यक्षिक–मार्गदर्शक शिक्षण मिळणे गरजेचे आहे कारण 'सायन्स' सतत बदलत असते. त्यात नवनवे शोध लागत असतात. केवळ पुस्तकी शिक्षण किंवा डिग्री असणे पुरेसे नसते. विद्यापीठाची बाब निराळी, त्यांचे तत्त्व ''डिग्री मिळवा, बाहेर पडा!'' पण व्यावसायिक शिक्षण हे मार्गदर्शन व प्रात्यक्षिकासह असायला हवे अशी माझी धारणा आहे. म्हणून मी हे कार्य अव्याहतपणे करतो आहे. यापुढेही करत राहणार!

एकीकडे मी माझे रिसर्च पेपर्स वाचत असतो. त्याकरता साऱ्या जगात जातो. जपानला दोन वेळा, अमेरिका–फिलिपाइन्स या देशांतही जातो. अशा रीतीने हे माझे विदेशी जाणे व परदेशस्थांचे इथे येणे – सध्या दुहेरी पद्धतीने कार्य चालू असते.

गोव्यात जाऊन, माझ्या गावी जाऊन रुग्णांना तपासण्याची सेवा तर मी १९७३पासून



**अहिल्याबाई रामाणी प्रतिष्ठान आयोजित मॅरेथॉनमध्ये 'स्नेहालय'मधील ज्येष्ठ नागरिक आणि वाडी गावातील तरुणांसह डॉ. रामाणी**

म्हणजे माझी 'कन्सल्टिंग' सुरू करण्या-आधीपासून करतो आहे. हजारोंना मी तपासलेले आहे, मार्गदर्शन केलेले आहे. ह्याशिवाय मी समाजात आरोग्यविषयक जागरूकता यावी म्हणून सोप्या भाषेत पुस्तके लिहिली आहेत. Prevention हे माझ्या दृष्टीने महत्त्वाचे असते!

प्रश्न – ज्या संस्थेशी आपला संबंध आलेला आहे किंवा जिथे जिथे तुम्ही अधिकारपदावर असता तिथे तुम्ही कशाप्रकारे समाजसेवा करता? त्याचे स्वरूप काय?

डॉ. रामाणी – पैसे वा देणगी देण्यापेक्षा मन लावून काम करणे (Half-Hearted नव्हे!) हे माझे तत्त्व आहे. माझ्या गावाला केंद्रस्थानी ठेवून मी तिथे समाजसेवा केली. अनेक सोयीसुविधा उभ्या केल्या. प्रत्येक वेळी तपशिलात जाऊन लक्ष पुरवलेले आहे (आजही हे काम करतो आहे!) मात्र अन्य ठिकाणी जिथे स्वत: वेळ देऊ शकणार नाही (involve होता येणार नाही!) तिथे पैशांची मदत करतो.

मात्र मदतीचा गवगवा करू नये असे माझे ठाम मत आहे. हे मला पूज्य पांडुरंगशास्त्री आठवले यांच्यामुळे समजले. मनावर बिंबवले गेले. कुठल्याशा समारंभात भगिनींना शिवणमशीन वाटप होत होते. शास्त्री तिथे प्रमुख पाहुणे होते. भावांतर्फे बहिणींना ही भेट देत आहोत असे जाहीर केल्यावर ते चिडले. कार्यक्रमातून उठून गेले. भाऊ जर बहिणीला काही देत असेल तर असा जाहीर गवगवा का करायचा?

असाच एक गोमांतक सेवासंघाचा वर्धापनदिन. तिथे गरजू पेशंटना किती किती रुपयांची मदत केली हे जाहीरपणे सांगत होते. मी त्यांना म्हटले, की तुम्ही लोकांचे दारिद्र्य असे जाहीर का करता? याऐवजी पाच पेशंटना अमुक रुपयांची मदत केली असं जाहीर करा. तुमच्या दानाचे असे जाहीर प्रदर्शन करू नका!

आता ही सार्वत्रिक प्रवृत्तीच झाली आहे – देण्यापेक्षा किती दिले हे सांगण्यावर जोर दिला जातो! हे मला तरी पटत नाही. मी वीस वर्षे अध्यक्ष आहे त्या संस्थेत, कार्य कसे करायचे, नेमकी मदत कुठे करायची याबाबत सतत मार्गदर्शन करत असतो.

प्रश्न – आपला समाज बदलतो आहे. जीवनशैली आमूलाग्र बदललेली आहे. तेव्हा चॅरिटी-दान याबद्दल काय फरक जाणवतो? हे इथेच आहे की विदेशातसुद्धा?

डॉ. रामाणी – आपल्याकडे आर्थिक स्थिती सुधारलेली आहे. लोकांकडे पैसा आहे. मात्र दान करताना प्रवृत्ती ढासळलेली असल्याचे दिसते. मदतीपेक्षा गवगवा करणे, मी किती मदत करतोय हे सांगण्याचा आटापिटा अधिक दिसतो आहे. तरीही प्रामाणिकपणाने कार्यरत असलेली माझ्यासारखी माणसे आहेत. प्रमाण कदाचित दहास एक असे असेल, पण आहेत. आमचे तत्त्व हे, की काम करत जा. हाका मारत जा. ही अशी जिद्द पाहिजे! म्हणून तर समाज पुढे वाटचाल करतो आहे.

बाकीच्या देशांत मदतीचा हात देणारी दानशूर माणसे आहेत. त्यामानाने आपण मागे आहोत. अमेरिकेसारख्या देशातील उद्योगपती एखाद्या वर्षाचा संपूर्ण नफा समाजाला देऊ शकतो. मी आजवर कमावलेले आहे, माझी गरज भागलेली आहे, असे म्हणून पूर्ण नफा देण्याचा निर्णय घेतात. एखाद्या वर्षाचा नफा दिल्याने आपण 'गरीब' असे त्यांना वाटत नाही. अशा प्रकारचा विचार करणारे उद्योगपती आपल्याकडे नाहीत.

असे जरी असले तरी सर्वसामान्य माणसे आपल्यापाशी असलेल्या मिळकतीतून मदतीचा-दानाचा विचार करतात. माझे एक पेशंट आहेत- अलिबागचे भास्कर पाटील. त्यांचे मी वीस वर्षांपूर्वी स्लीप डिस्कचे ऑपरेशन केले होते. ते अजूनही वर्षातून एकदा माझ्या घरी येतात. येताना शेतातली भाजी घेऊन येतात. मी जरी भेटलो नाही तरी माझ्या मिसेसशी बोलतात. इतकेच नाही तर रिटायर झाल्यावरही ते आपल्या पेन्शन फंडातील दरवर्षी रु. १००००/- आमच्या ट्रस्टला-अहिल्याबाई रामाणी ट्रस्टला 'देणगी' देत आहेत. ही दानत फार महत्त्वाची.

प्रश्न – सर, आपल्यामध्ये ही 'दान'



अनेक वर्षं चाललेला मेडिकल कॅम्प

करण्याची, समाजाला मदत करण्याची वृत्ती आपल्या आईमुळे- अहिल्याबाईंमुळे आली आहे का?

डॉ. रामाणी – हो तर. माझी आई त्या काळातली सातवी शिकलेली. अनेकांना मदत करायची. दुसऱ्यांकडे जाऊन वर्षानुवर्षे मदत करायची. घरी आलेल्या माणसाला जेवायला वाढायची. तेव्हा दान करण्याची दानत होती. लोकांनी तिच्या सेवाभावीवृत्तीचा गैरफायदा करून घेतला पण कृतज्ञता ठेवली नाही, ह्याचेच मला वाईट वाटते. मात्र तिची ही वृत्ती मी पुढे जोपासली. दानाचा वसा चालू ठेवला.

आमच्या घरातही हे अगंवळणी पडलेले आहे. माझी पत्नी- प्रतिमा माझ्याकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचे, पेशंटस्‌चे ममतेने आदरातिथ्य करते. पेशंट्स घरी येतात. त्यांना मी जरी भेटलो नाही तरी त्यांच्या ताई भेटल्यावर गप्पा मारतात. त्यांना यामुळे समाधान मिळते. आमची कामवालीदेखील विचारपूस करते.

प्रश्न – सांस्कृतिक योगदानाबद्दल काय सांगाल?

डॉ. रामाणी – या विषयाबद्दल बोलायला मी काही तज्ज्ञ नाही. समाजाबद्दल मला जे करायचे ते मी मनापासून करत राहतो. एखादी नवीन वस्तू दिसली तर गोव्यातील गावासाठी पाठवतो. मी व्यावसायिक शिस्त पाळतो. पेशंट्स क्लिनिकच्या वेळी मी दुसरे काही करत नाही. फावल्या वेळात लोक पत्ते- दारूत वेळ घालवतात. मी माझ्या आवडीच्या कामात कार्यरत राहतो. वेळ घालवत नाही. मी माझ्या कुटुंबासाठी पुरेसा वेळ देऊ शकत नाही कारण मी हे व्रत घेतलेय.. हा सेवाधर्म स्वीकारलेला आहे.

प्रश्न – आपण फास्ट लाइफ जगणाऱ्या समाजाला काय मार्गदर्शन कराल? आपला वारसा पुढे चालू राहावा असे वाटते का?

डॉ. रामाणी – समाज जलद गतीने बदलतोय हे मी मान्य करतो. मी दानाचा, ज्ञानदानाचा वारसा जपलाय. तसा तो प्रत्येकाने जपावा असे मला वाटते. आपल्यामागे शेवटी काय, तर 'Legacy' राहते. ती घरात, घराबाहेर, देशात, देशाबाहेर... जिथे तुम्ही जाल तिथे निर्माण करा. छोट्या कामातून, मोठ्या गोष्टींतून ही 'लिगसी' टिकवा.

माझ्या मुलाने – त्याच्या पिढीने काय करावे, हा त्यांचा प्रश्न आहे. त्यांनी त्यांच्या विचाराने पुढे जावे. मी करतो तेच करावे, तशाच पद्धतीने करावे असा आग्रह नाही. अपेक्षाही नाही.

माझ्या नातीचे उदाहरण सांगतो. तिला अनेक वेळा बर्थ डे पार्टीज्‌ना जावे लागते. हल्ली थीम पार्टीज् असतात. मग मरमेडचा ड्रेस करा...! एका आठवड्यात चार-पाच बर्थडे आले तर गिफ्ट, नवीन ड्रेस हा सगळा खर्च येतोच की! हे सगळे व्यापारीकरण झालेले आहे – माझा प्रश्न आहे, ह्यातून सुख मिळते का?


ही स्पर्धा आहे. ह्यातून दु:ख तर वाढणार नाही ना, अशी मला भीती वाटते. ह्याबद्दल मी माझे मत व्यक्त करू शकतो, पण मी काही समाजसुधारक नाही.

समाजसेवा करणे, विद्यादान करणे हा मला समृद्ध करणारा छंद आहे आणि तो मी करत राहणारच!

आजवर मी अनेकांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. प्रत्येक वेळी मान्यवरांना- कलावंतांना भेटण्यासाठी त्यांच्या घरी/ नाट्यगृह/लोकेशन/हॉटेल अशा ठिकाणी जावे लागते. पण डॉक्टरांच्या बाबतीत एक वेगळाच अनुभव आला. मला १२ ते ६ या वेळेत जमत नव्हते आणि ते तर दुपारी ३ ते रात्री १०पर्यंत क्लिनिकमध्ये बिझी... त्यावर त्यांनीच तोडगा काढला. मला विचारले की सकाळी कितीला उठतो? मी सहा असे म्हटल्यावर ते म्हणाले की फार उशिरा! मी साडेचारला उठतो आणि योगा/व्यायाम- जॉगिंग करतो. मीच तुझ्याकडे सकाळी सहाला येतो आणि अक्षरश: पावणेसहाला घरी हजर झाले! ते घरी आले आणि आमच्या घरातल्या सर्वांनाच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा प्रसन्न अनुभव घेता आला. असा दुर्मिळ योग माझ्या आयुष्यात आला तो केवळ मुलाखत घेण्याची संधी मिळाली म्हणूनच! इतका मोठा माणूस मुलाखत देण्यासाठी स्वत: घरी येतो, हे असामान्य आहे. आपण वेळेबाबत किती बाऊ करतो... हेही प्रकर्षाने जाणवले.

**– राजीव जोशी**
rmjoshi52@yahoo.co.in

# वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

## आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, मग अध्यात्म ते काय? – शरद बेडेकर

आम्हा विवेकवाद्यांचा संतांना निरोपाचा नमस्कार

आता आम्ही विवेकवादी, संतांना निरोपाचा नमस्कार करत आहोत तो ऐका. मायबाप संतश्रेष्ठ ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम, आम्ही ठामपणे तुमच्या विरोधात बोलतो व लिहितो आहोत म्हणून आम्हाला माफ करा. मात्र तुमचीच शिकवणूक म्हणून आम्ही हे बंड करतो आहोत. अखंड नामजप, भजनपूजन, श्रद्धा, देवदर्शन, व्रते, प्रार्थना, भक्ती इत्यादी सर्वांच्या विरोधात आम्ही उभे आहोत. आमचा काळ आणि परिस्थिती आता पूर्णत: बदललेली आहे. त्यामुळे तुम्ही सांगितलेली श्रद्धाशीलता आम्ही साफ नाकारतो आहोत....

जगातील सर्व राष्ट्रांचे जीवन आज परस्परावलंबी झालेले आहे. तुम्हा थोरांच्या शिकवणुकीमुळे आम्हालाही असे वाटते, की आमच्या जगात सर्वांनी सुखी समाधानी व्हावे. परंतु त्यासाठी 'धर्मपरायणता' किंवा 'ईश्वर-पूजाप्रार्थना' हे मार्ग आम्हाला मुळीच योग्य वाटत नाहीत. आता आमच्या युगाला साजेशा विज्ञानाच्या, समानतेच्या व आम्हाला जी मानवता अभिप्रेत आहे तिच्या मार्गाने जायचे आम्ही ठरवलेले आहे. तरीही आमच्या पूर्वजांचा इतिहास म्हणून आम्ही तुमची आदरपूर्वक आठवण नक्कीच ठेवू आणि आमचे पूर्वज फार चांगली माणसं होती ह्याचा अभिमानही बाळगू. पण आम्हाला आज जे योग्य वाटते तेच करू. बरे आहे. नमस्कार.

– शरद बेडेकर

---




**मूल्य १०० रु.**
**सवलतीत ६० रु.**

## वानुळा – साहेबराव चवरे

प्रा. साहेबराव चवरे यांनी मोजक्याच पण आशयपूर्ण कथा लिहून ग्रामीण कथाविश्वात आपला ठसा उमटविला आहे. अस्सल ग्रामीण बोलीभाषेतील त्यांच्या कथा वास्तववादी ग्राम्य जीवनाचा परिचय करून देतात. ग्राम्य जीवनाचं सूक्ष्म निरीक्षण करून त्यांनी लिहिलेल्या कथा त्यांच्या संवेदनशील मनाचा परिचय करून देतात. नर्मविनोदी संवादशैली आणि बोलीभाषेतील चपखल शब्दयोजना- म्हणी, वाक्प्रचार- यामुळे त्यांच्या कथा बहारदार, कसदार ठरतातच, शिवाय समाजमनाचे प्रबोधनही करून जातात. ग्रामीण जीवनातील सामान्य माणसाच्या जगण्याच्या समस्या प्रा. चवरे आपल्या कथेतून सहजसुलभ, ओघवत्या भाषेत मांडतात. 'जसं जगणं-तसं लिहिणं' हे त्यांच्या कथालेखनाचे सूत्रबीज आहे. काल्पनिकतेला त्यांच्या कथेत थाराच नाही. त्यांनी कथेतून मांडलेली समस्या प्रत्येक ग्रामीण माणसाला आपलीच वाटून जाते. लेखकाला भावणारे खेड्यातील वास्तव जीवन त्यांनी प्रभावीपणे मांडले आहे. त्यामुळे मराठी कथाविश्वात त्यांच्या कथा अव्वल ठरतील यात शंकाच नाही.


– प्रा.सुभाष कवडे

# अभियांत्रिकीच्या जगात

**सुशील चव्हाण**

पैठणी महाग का असते, धातूचा पत्रा पाण्यानं कसा कापतात, धुकं असतानाही वैमानिक विमान कसं उतरवतो, संगणकाचा माऊस कसं काम करतो, सिमेंट नसूनही जुन्या इमारती शतकानुशतकं कशा टिकल्या, कार्पेट, बिल्टअप, सुपर बिल्टअप एरिया कसे ठरवतात, वॉशिंग मशीनच्या स्पिनरमध्ये कपडे कसे वाळतात, लायटरमध्ये ठिणगी कुठून येते अशा अनेक प्रश्नांचं कुतूहल आपल्या मनात असतं. दैनंदिन कामात हे कुतूहल शमवण्याचं भान आपल्याला नसतं किंवा त्यासाठी आपल्याकडे वेळ नसतो. त्याला फारसं महत्त्वही देत नाही आपण. मग कधी घरातील लहानग्यानं त्याच्या मनातील कुतूहल विचारलं की आपली तारांबळ उडते. त्यावेळी आपण काहीतरी सांगून वेळ मारून नेतो. पण आपल्याला त्याचं कुतूहल शमवता आलं नाही, अशी रुखरुख मनात राहते.

'अभियांत्रिकीचे जग' हे पुस्तक याबाबतीत आपल्याला मदत करू शकेल, असं वाटतं. २०११साली लोकसत्ता वृतापत्रात मराठी विज्ञान परिषदेनं 'कुतूहल' या सदरातून अभियांत्रिकीच्या दुनियेची ओळख करून दिली. सिव्हिल, इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, एरॉनॉटिकल, टेक्स्टाईल, टेलिकम्युनिकेशन, मेटॅलर्जी या नेहमीच्या शाखांबरोबरच स्पेस, न्युक्लियर, मेडिकल, कॉम्प्युटर, मायनिंग, हाऊसहोल्ड असे अनेक विषय यात हाताळण्यात आले. विज्ञान-अभियांत्रिकीच्या विविध शाखांमधील तज्ज्ञ लेखकांनी यातून वाचकांना खाद्य पुरवलं. या सदराला वाचकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह




अ.पां. देशपांडे यांनी या लेखांचं संपादन केलं. नागपूरच्या ज्ञानेश प्रकाशनानं पुस्तकरूपात हे प्रसिद्ध केलं आहे.

पुस्तकात आरंभी अभियांत्रिकीच्या इतिहासात आपण थोडं डोकावतो आणि अभियांत्रिकी म्हणजे एखादी गोष्ट कमीत कमी श्रमात घडवून आणण्यासाठी केलेलं व्यवस्थापनच असतं हे लक्षात येतं. अन्न मिळवण्यासाठी, जनावरांची शिकार करण्यासाठी मनुष्य दगड वापरत असे. मग असा दगड धारदार असला तर प्राणी लवकर जखमी होईल असं त्याला वाटलं. धारदार दगड शोधत बसण्यापेक्षा कोणत्याही दगडाला घासून धार काढायचं तंत्र त्यानं विकसित केलं. हे तंत्र म्हणजे अभियांत्रिकीच होती. त्यामुळे अभियांत्रिकी ही अलीकडची गोष्ट नसून माणूस गुहेत राहायला लागल्यापासूनच ती अस्तित्वात आहे, हे पटतं.

सुरुवातीला मनुष्याच्या मूलभूत गरजांशी निगडित अभियांत्रिकीच्या शाखांचा उदय झाला, असं म्हणता येईल. मनुष्याच्या राहणीमानात प्रगती होत गेली तशा त्यांच्या उपशाखा निर्माण होत गेल्या. औद्योगिक क्रांतीनंतर यांत्रिक, विद्युत, रसायन, वस्त्रोद्योग, वैमानिकी, संदेशवहन अशा अनेकानेक शाखांमुळे अभियांत्रिकीचा उत्तरोत्तर विकास होत गेला.

या विकासाबरोबरच माणसाच्या जगण्याचा वेग अनेक पटींनी वाढला. इंधन, धागे, प्लॅस्टिक यांसाठी लागणाऱ्या रसायनांसाठी पेट्रोरसायन शाखेची निर्मिती झाली. ही पेट्रोरसायनं असतात कशी, भारतात ती कोठे बनतात, ती बनवताना कोणकोणते धोके असतात, आणखी किती काळ ती उपलब्ध होऊ शकतात, या सगळ्यांची उत्तरं अ.पां.देशपांडे यांच्या लेखांतून आपल्याला मिळतात. स्वयंपाकघरात गृहिणीला कराव्या लागणाऱ्या विविध प्रक्रियांना कमी परिश्रम पडावेत यासाठी साध्या यंत्रांची निर्मिती झाली. रवीसारख्या साध्याशा यंत्रानं घुसळल्यावर अपकेंद्री बलामुळे लोण्याचा गोळा तयार होतो, हे सांगून डॉ. मानसी राजाध्यक्ष विज्ञान आणि अभियांत्रिकी हातात हात घालून चालतात हे दाखवतात. याचप्रमाणे पिझ्झा कटर, लसूण सोलायचं यंत्र, दह्याचं यंत्र, कूकर, लायटर, काडेपेटी कसं काम करतात, गव्हाचं पीठ-मैदा यांतील फरक, सिलेंडरमधल्या गॅसचं स्वरूप अशा लेखांतून स्वयंपाकघराचा

अभियांत्रिकीशी खूप जवळचा संबंध असल्याचंही कळतं. यावरून वाटतं की गृहिणी यासुद्धा एकप्रकारे अभियंता असतात!

सणासुदीला कापड खरेदी करताना कापडावरील 'सबस्टँडर्ड', 'सेकंड्स' असे शिक्के बघावेत, कारण त्यावरूनच कापडाचा दर ठरतो. दिलीप हेर्लेकरांनी टेक्स्टाईल इंजिनीअरिंगविषयी लिहिलेल्या लेखांतून आपल्याला अशीच उपयुक्त व रंजक माहिती मिळते. कापडावर डाग लागण्याची कारणे व उपाय, कापडाचा रंग का जातो, सुती कापड का आटतं, गालिच्याचं विणकाम; हे लेख आपल्या सामान्यज्ञानात अधिक भर घालतात. होलोग्रामवरून रेशीम कसं ओळखायचं, पैठणी वापरताना काय काय काळजी घ्यायची, लोकर कशी मिळवतात, शाली कशा बनवतात; हे लेख तर खास स्त्रियांना भावणारेच!

बापू अडकिने यांच्या लेखांतून शेती फायदेशीर होण्यासाठी अभियांत्रिकीची गरज पडते, हे जाणवतं. याच अनुषंगानं पाण्याच्या टंचाईवर काही उपाय उल्हास परांजपे यांनी सुचवले आहेत. केळी, अंबाडी, ज्यूट, नारळ या पिकांचे उरलेले भाग वापरून टाक्या कशा बनवायच्या, त्यातील पाण्याचं बाष्पीभवन कसं रोखायचं, फेरोसिमेंटच्या टाक्या कशा बनवायच्या याबाबत त्यांनी मार्गदर्शन केलं आहे. मलशुद्धीकरणाच्या व्यवस्थेबद्दल सांगताना यशवंत दामले यांनी शेतीसाठी हे पाणी तसंच सांडपाणी वापरण्याचं सुचवलं आहे. यासंबंधी पुण्यातील साकुर्डे गावच्या ज्ञानेश्वर चव्हाण यांनी केलेल्या प्रयोगाचा दाखला त्यांनी दिला आहे.

महाभारतात प्लॅस्टिकचा पहिला संदर्भ सापडतो. प्रशांत कुलकर्णी यांनी आपल्या रोजच्या वापरातील प्लॅस्टिकचा असा इतिहास सांगून वेगवेगळ्या प्रकारच्या प्लॅस्टिक्सवर प्रकाश टाकला आहे. दुधात प्लॅस्टिक बनवण्यासाठीचा आवश्यक पदार्थ असतो, अशा रंजक माहितीमुळे हे लेख वाचनीय झाले आहेत.

मध्यंतरी मिग विमानांच्या अपघातांनी देशभर खळबळ उडवली होती. या घटना का घडतात, याची कारणमीमांसा डॉ. अविनाश वळवडे यांनी केली आहे. विमानाला धावपट्टी लांब का लागते आणि हेलिकॉप्टर सरळ वर का जातं, भारतीय बनावटीचं विमान १००% भारतीय असतं का यांबद्दलही त्यांनी माहिती दिली आहे.

किडलेले दात भरण्यासाठी पारा व चांदी यांचं संमिश्र का वापरतात, पूर्वी राजदरबारात खास पाहुण्यांसाठी चांदीऐवजी ॲल्युमिनियमचे काटे-सुऱ्या का वापरत, धातूची वस्तू बनवण्यासाठी साचा कसा बनवतात, सोन्याची शुद्धता कॅरटमध्ये कशी मोजतात, लोखंडी तलवारीला पाणी कसे देत असत अशा धातुशास्त्रामधील गमतींबद्दल योगेश सोमण यांनी लिहिलं आहे.

अणुऊर्जा, अणुभट्टी, अणुभट्टीतील अपघात, किरणोत्सारी कचऱ्याची विल्हेवाट, अंतराळयानात अणुतंत्रज्ञान... अशा लेखांद्वारे डॉ. राजीव चिटणीस यांनी अणु तंत्रज्ञानाचं जग उलगडून दाखवलं आहे.

मुंबईत बांद्रा उपनगर ते वरळी हे अंतर गाडीनं जाण्यासाठी खूप वेळ लागत असे. म्हणून या दोन ठिकाणांदरम्यान सागरी पूल बांधण्यात आला. त्याचा पाया कसा उभारतात, या कामात कोणते अडथळे पार करावे लागतात, साधं बांधकाम व सागरी बांधकाम यांत काय फरक असतो याचं ज्ञान अरुण कर्णिक यांच्या लेखांतून मिळतं.

सिनेमास्कोप चित्रपट कसा बनतो, सिनेमाचा कॅमेरा कसा असतो, डॉल्बी डिजिटल तंत्रज्ञान, डिजिटल थिएटर, फिल्म प्रोजेक्टर, सबटायटल्सचं तंत्र अशी मनोरंजक माहिती उज्ज्वल निरगुडकर यांनी दिली आहे.

याशिवाय, कीर्ती वडाळकर व हेमंत वडाळकर यांचे भूकंपरोधक इमारतींविषयी, सुनील पोतनीस यांचे छपाई तंत्रज्ञानविषयी, सुधीर टिळक यांचे रस्तेविषयी, सागर देशमुख यांचे ऑटोमोबाईलविषयी, डॉ.केतन गोखले यांचे रेल्वेविषयी, श्रीकृष्ण भागवत यांचे कचरा निर्मूलनाविषयी, जगन्नाथ टिळक यांचे विद्युत, स्थापत्य व उपकरण अभियांत्रिकी-विषयी, वि.य.केळकर यांचे इलेक्ट्रॉनिक्स-विषयी, डॉ.राजीव चिटणीस यांचे पारंपरिक तसंच अपारंपरिक ऊर्जेविषयी, अचिंत्य बाक्रे यांचे संगणक अभियांत्रिकीविषयी, प्राची मर्चंट यांचे वास्तुशिल्पीविषयी, जितेंद्र लोणकर यांचे नगरनियोजन, वाहतूक-दळणवळण विषयी, अ.पां.देशपांडे यांचे वेगवेगळी हत्यारं, अवजारं, मापन उपकरणं यांविषयी लेख पुस्तकात आहेत.

सुमारे ४०० पानांच्या या पुस्तकाचं मूल्य ३५० रुपये आहे. त्यातील उपयुक्त माहितीच्या तुलनेत हे मूल्य फार वाटत नाही. इंटरनेटवर अशी माहिती मिळवायला गेलो, तर अगोदर ती माहिती शोधणं, मग वाचणं, आवडली तर साठवणं, अन्यथा पुन्हा दुसरी माहिती शोधणं, पुन्हा साठवलेल्या माहितीचे प्रिंट्स काढणं, ते फाईलमध्ये साठवणं असे सव्यापसव्य करावे लागतात. त्यात वेळ, ऊर्जा आणि पैसाही खर्च होतो. शिवाय कॉम्प्युटर-वर सतत वाचन केल्यामुळे डोळ्यांचं नुकसान होतं ते वेगळंच. या तुलनेत पुस्तक खरेदी करून संग्रही ठेवणं आणि वाचणं योग्य ठरेल. या पुस्तकातील अक्षरं नेहमीपेक्षा मोठ्या टाईपमध्ये आहेत, त्यामुळे वाचायला सोपे पडते. पुस्तकाची बांधणी व मुखपृष्ठ आकर्षक आहे. अभियांत्रिकीसंबंधित विविध छायाचित्रांचं एकत्रीकरण मुखपृष्ठामध्ये दिसतं. मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह अ.पां.देशपांडे यांनी पुस्तकाला प्रस्तावना लिहिलेली आहे. पुस्तकाच्या अखेरीस लेखकांचे नाव-पत्ते, दूरध्वनी क्रमांक, इमेल पत्ते देऊन वाचकांना लेखांवर आपला प्रत्यक्ष प्रतिसाद देण्याची सोय केली आहे.

**- सुशील चव्हाण**
५२/१६४२ , आशीर्वाद, बी विंग,
नेहरूनगर, कुर्ला (पूर्व),
मुंबई - ४०००२४
(दूरध्वनी ९७५७३९१३८०)
shananda26@yahoo.com

अभियांत्रिकेचे जग
संपादक : अ.पां.देशपांडे
प्रकाशक : ज्ञानेश प्रकाशन, , नवनिर्माण सोसायटी, प्रतापनगर, नागपूर
मराठी विज्ञान परिषद (मुंबई) यांच्यासाठी

यश हे अमृत झाले!

# 'जीवन आणि स्वास्थ्य' पुस्तकाचे प्रकाशन

## प्रभाकर भिडे

''डॉक्टरांचे एक स्मितहास्य रुग्णाचे सर्व काळोख उजळून टाकतात. त्यांच्या हातात जादू आहे. ते देव-देवतार्जन करत नाहीत पण रुग्णाची सेवा करण्यात, त्याच्या वेदना नाहीशा करताना ईश्वर पाहतात. ते कायम दुसऱ्यासाठी झटत असतात. त्यामुळे त्यांचे मन धवल आहे. त्यांच्या हातात कायम यश असते.'' असे उद्‌गार स्नेहलता देशमुख (माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ) यांनी डॉ. रामाणी यांच्या 'जीवन आणि स्वास्थ्य' या ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या पुस्तक प्रकाशनसमारंभावेळी काढले. त्या पुढे म्हणाल्या, की ''त्यांच्या आईने त्यांचे नाव प्रेमानंद ठेवले. तिला बहुतेक माहीत असावे की हे रुग्णांना वेदनांपासून मुक्ती, आनंद देतील, त्यामुळे आपोआप प्रेम निर्माण होईल. साहजिकच त्यांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य कधीच लोपत नाही. आज ७५ व्या वर्षी-अमृत महोत्सवात पदार्पण करताना त्यांनी आपले आरोग्य तरुणासारखे जपले आहे.''

गोव्यातील एका खेडेगावात मध्यमवर्गात जन्माला आलेला मुलगा अंगभूत हुशारीने व मेहनतीने मॅट्रिकला (गोव्यात) पहिला येतो. पुढे यशस्वी डॉक्टर होतो. स्पायनल कॉड सर्जरीकरता इंग्लंडला जातो. तेथे पाच वर्षे मेहनत व कौशल्याने पाठीच्या कण्याचा नामवंत तज्ज्ञ म्हणून जगात नावारूपाला येतो. परंतु तेथेच न राहता आपल्या ज्ञान व अनुभवाचा फायदा आपल्या देशबांधवांकरता देण्यासाठी 'सायन जनरल रुग्णालयात' काम करतो. तेथे अध्यापनासह भारतातील पहिली बोन बँक सुरू करण्यासारखे महत्त्वपूर्ण कार्य करतो. डॉ. स्नेहलता देशमुख तसेच आजच्या समारंभाचे अन्य प्रमुख पाहुणे डॉ. नंदकिशोर लाड यांचा सहकारी तज्ज्ञ डॉक्टर बनतो.

यावेळी शुश्रूषा हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ. नंदकिशोर लाड डॉ. रामाणींविषयी बोलताना म्हणाले, ''डॉ. रामाणी नुसतेच तज्ज्ञ सर्जन नाहीत. त्यांनी आपल्या खेड्यात मेडिकल कॅम्प भरवले. व्यायामशाळा बांधली, वाचनालय निर्माण केले. मंदिर दुरुस्त केले. लहान मुलांचे बालपण जपण्यासाठी वेगवेगळी खेळणी बसवली. हे सर्व स्वखर्चाने केले. अहिल्याबाई रामाणी प्रतिष्ठान व डॉ. रामाणी मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून जन्मगावाची सेवा आरंभली. समाजाविषयी, गरिबांविषयी कळवळा, आपुलकी असल्याशिवाय आपल्याजवळील धन वेचून गरजूंकरता कोणी असे करत नाही. परदेशांत त्यांच्यावर पोस्टाचे तिकीट निघते, एक ऑपरेशन थिएटर त्यांच्या नावाने बांधले जाते. मात्र या देशात त्यांचा योग्य सन्मान होत नाही, हे दुर्दैव आहे.''

ते नुसते डॉक्टर नाहीत तर त्यांना संगीत व साहित्याची रुची आहे. ते उत्तम तबला वाजवतात. इंग्रजी व मराठीमध्ये लेखन करतात. स्वत: मिनी मॅरेथॉन भरवतात. त्यामध्ये सहभागी होतात. जगात अनेक ठिकाणी ऑपरेशनसाठी जातात. इतका बिझी मनुष्य अनेक समारंभ, गावातील उपक्रमांसाठी वेळ काढतो. कारण त्यांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे कविवर्य बोरकरांनी म्हटल्याप्रमाणे- 'मीपण ज्यांचे पक्व फळापरी सहजपणाने गळले हो, जीवन त्यांना कळले हो.' नको नको म्हणत असताना त्यांनी बऱ्या केलेल्या अनेक रुग्णांनी, ज्यामध्ये अलिबाग रुग्ण मंडळापासून गोव्यापर्यंतच्या अनेक रुग्णांचा सहभाग होता, डॉक्टरांचा सत्कार केला. यावेळी गोवा हिंदू असोसिएशनचे प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व रामकृष्ण नायक, सारस्वत बँकेचे अध्यक्ष एकनाथ ठाकूर असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला आणखी एक पाहुण्या अनुराधा ठाकूर यांनी डॉ. रामाणींच्या अनेक उत्स्फूर्त आठवणी सांगितल्या. त्यांच्या बोलण्यामधून डॉक्टरांच्या जिव्हाळ्याच्या नात्याने कसे बांधून ठेवले ते सांगून कार्यक्रमाचे वातावरण एका उंचीवर नेले.

या प्रसंगी प्रकाशित झालेल्या 'जीवन आणि स्वास्थ्य' या छोटेखानी पुस्तकात आरोग्यासंबंधीच्या अनेक महत्त्वाच्या टिप्स सांगितल्या आहेत. डॉक्टर मुंबई सकाळमध्ये 'आधारवड' नावाचे सदर चालवत असत, त्याचे हे संकलन आहे. या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. स्नेहलता देशमुख यांच्या हस्ते झाले.

या पुस्तकाबरोबरच त्यांच्या 'ताठ कणा' या आत्मचरित्राच्या पंधराव्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. लाड यांच्या हस्ते झाले आणि 'सत्तरीचे बोल' पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचे प्रकाशन अनुराधा ठाकूर यांच्या हस्ते झाले. 'ताठ कणा'च्या आठ वर्षांत पंधरा आवृत्त्या आणि 'सत्तरीचे बोल' या पुस्तकाची सहावी आवृत्ती प्रकाशित



डॉ. स्नेहलता देशमुख



डॉ. नंदकिशोर लाड



अनुराधा ठाकूर



डॉ. पी.एस. रामाणी

झाली, एवढी त्यांची पुस्तके लोकमान्य आहेत.

या कर्तृत्ववान माणसाने आपले 'जीवन आणि स्वास्थ्य' हे पुस्तक आपल्या सहचारिणीस अर्पण केले आहे. आपले सर्व व्याप, परदेश दौरे व संसार आपल्या पत्नीने सांभाळून ती खंबीरपणे आपल्यामागे उभी राहिली म्हणून हे शक्य झाले असे त्यांनी कृतज्ञतापूर्वक सांगितले.

या कार्यक्रमाचे उत्स्फूर्त स्वरूप, भरपूर प्रेक्षकवर्ग, डॉक्टरांची अतिशय खिलाडूवृत्ती यामुळे केक कापून घरगुती कार्यक्रमाच्या रूपाने ७५ वा वाढदिवस मजेत साजरा झाला. जणू घरगुती कार्यक्रमाला सार्वजनिक रूप दिले गेले. कार्यक्रम दृष्ट लागण्यासारखा झाला.

यावेळी प्रकाशक या नात्याने 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकर यांनी, आठ वर्षांपूर्वी डॉक्टरांशी 'ताठ कणा' या पुस्तकामुळे संबंध कसा आला, तो वृद्धिंगत होऊन त्यांचे ग्रंथालीशी आपुलकीचे नाते कसे कसे जोडले गेले हे आवर्जून सांगितले. त्यांची तिन्ही पुस्तके प्रकाशित करण्याची संधी ग्रंथालीला मिळाली याबद्दल आनंद व्यक्त केला.

यावेळी डॉ. स्नेहलता देशमुख यांनी, मी ज्या पुस्तकाचे प्रकाशन करते त्याच्या अनेक आवृत्त्या निघतात, त्याप्रमाणे या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघतील असे गमतीने सांगितले. असे देखणे कार्यक्रम हल्ली फार थोडेच होतात.

या कार्यक्रमाच्या सत्काराला उत्तर देताना डॉ. रामाणींनी भाषण न करता जीवन आणि स्वास्थ्य कसे राखावे हे आपल्या Power Point Presentation द्वारे सांगितले. विविध नवीन औषधे व उपाययोजनांमुळे यावर्षी जन्मणाऱ्या १०० मुलांपैकी ५० मुले १०० वर्षांपेक्षा जास्त आयुष्य जगतील ही विज्ञानाची किमया असली तरी त्यांनी स्वास्थ्यदृष्ट्या कसे चांगले राहावे ते अतिशय खुशखुशीतपणे सांगून आपण आता ७५ वर्षांचे असून शंभराच्या वर जगण्याचा आत्मविश्वास आहे असे आवर्जून सांगितले. ते पुढे म्हणाले, की शारीरिक स्वास्थ्याइतकेच समाजऋणही मनात हवे. आपल्या घडणीत आई-वडील, शिक्षकांइतकाच समाज हा गुरू असतो हे भान ठेवायला हवे. आपण किती जगलो, किती संपत्ती मागे ठेवली यापेक्षा आपण समाजासाठी काही करून कीर्तिरूपे उरण्यातच जगण्याची सार्थकता आहे.

कार्यक्रमाचे निवेदन स्नेहा आधारकर यांनी केले. प्रत्येक वक्त्याची वैशिष्ट्ये सांगत एकप्रकारे जान आणली व एक सुंदर वातावरण निर्माण केले. अशा बोलण्यामुळे कार्यक्रम सर्वांना हवाहवासा वाटला. डॉक्टरांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसामुळे त्यांच्या यशाचे रूपांतर अमृतात झाले व कार्यक्रमाचे नाव सार्थ झाले. अशा या अमृतमयी कार्यक्रमातून श्रोत्यांची जगण्याची उमेद वाढावी इतका डॉक्टरांचा आशावादी दृष्टिकोन दिसून आला.

**– प्रभाकर भिडे**
९८९२५६३१५४





## जीवन आणि स्वास्थ्य – डॉ. पी.एस. रामाणी

जागतिक कीर्तीचे न्यूरोस्पायनल सर्जन डॉ. पी.एस. रामाणी यांनी लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह. जीवन सुखमय व्हायचं तर शरीरस्वास्थ्य राखायला हवं. त्यासाठी काय करावं हे ते जसं सांगतात, तसंच आपल्या जीवनाचं सार्थक होण्यासाठी समाजाचं स्वास्थ्य राखण्यातही आपण कसं सहभागी झालं पाहिजे हेही ते सांगतात. ज्या समाजानं घडवलं त्याचं देणं आपण लागतो याचं भान देतात. जगण्याची दृष्टी सकारात्मक करणारे हे छोटेखानी लेख 'जीवन आणि स्वास्थ्य' याची सांगड घालण्याचे उत्तम मंत्र आहेत.

**मूल्य ८० रु. सवलतीत ५० रु.**

# विवाहाला लिव्ह इन रिलेशनशिपचा व्यवहार्य पर्याय! वाचकदिनी रंगला परिसंवाद

ग्रंथालीचा वाचकदिन कीर्ती महाविद्यालयाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. डॉ. पी. एस. रामाणी, डॉ. नरेंद्र जाधव आणि कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्च व्ही. एन. मगरे यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

प्रकाशन समारंभात बोलताना डॉ. पी. एस. रामाणी यांनी वाचक कमी झालेला नाही, तर त्याच्या अभिरुचीनुसार तो वाचतो. वाचनालयांतून वाचकप्रिय पुस्तकांसाठी नंबर लावावे लागतात असा अनुभव त्यांनी कथन केला. ग्रंथालीच्या कार्याचा गौरव केला व ते म्हणाले, की आजच्या काळात खूप आकर्षणं आपल्यापुढे आहेत, तरीही या वाचकदिनाला झालेली गर्दी पाहून पुस्तकांचे महत्त्व कायम आहे हे सिद्ध होते.

डॉ. नरेंद्र जाधव यांच्या 'रवींद्रनाथ टागोर समग्र जीवनदर्शन' घडवणाऱ्या ग्रंथत्रयीचे प्रकाशन डॉ. रामाणी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी बोलताना डॉ. जाधव म्हणाले, की रवींद्रनाथ महाराष्ट्राला समजलेच नाहीत. त्यांच्या एकूणच काव्य, व्यक्तित्व आणि कामगगिरीचा थोडक्यात आढावा त्यांनी मांडला व या विश्वमानवाची महत्ता सांगितली. ग्रंथालीविषयी कौतुकोद्गार काढून ते म्हणाले, की वाचक चळवळ ग्रंथालीमुळेच जिवंत राहिली आहे. ज्या पुस्तकांना व्यावसायिक मूल्य कदाचित असणार नाही अशी चाकोरीबाहेरची पुस्तकं प्रसिद्ध करण्याचं काम ग्रंथाली सातत्यानं करत आहे.

पुस्तकनिर्मितीत मोलाची भूमिका बजावणाऱ्या लेखकांना पुस्तकविक्रीत मात्र कवडीमोल किंमत मिळते अशी खंतही डॉ. जाधव यांनी बोलून दाखवली. कीर्ती महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन. मगरे यांनी ग्रंथालीशी महाविद्यालयाचा असलेला ऋणानुबंध विशद केला. ग्रंथालीमुळे वाचनप्रसार सुरू राहिला आहे असे सांगत, महाविद्यालय सदैव त्याबरोबर राहील असे सांगितले.

प्रकाशन समारंभाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर 'विवाहाला लिव्ह इन रिलेशनशिपचा व्यवहार्य पर्याय' या आजच्या काळातील प्रश्नावर आयोजित परिसंवादाला मोठा प्रतिसाद लाभला. एका महत्त्वाच्या विषयाला वाचा फोडण्याचे काम ग्रंथालीने केले आहे, अशी प्रतिक्रिया श्रोत्यांकडून मिळाली. या परिसंवादात मंगला आठलेकर, सतीश तांबे, ॲड. असीम सरोदे, कमलेश वालावलकर आणि शाल्मली पेठे यांचा सहभाग होता. सूत्रचालन प्रसन्न जोशी (एबीपी-माझा) व नीरजा यांनी केले.

नातेसंबंधामध्ये 'लिव्ह इन'चा पर्याय विचारात घेतला जात असला, तरी अजूनही मध्यमवर्गीय मात्र समाजाच्या भीतीमुळे 'लिव्ह इन'पासून कोसो दूर आहेत; तरीही विवाहसंस्थेची पहिली पायरी म्हणून 'लिव्ह इन'चा विचार करायला हरकत नाही, असे विचार या परिसंवादातून पुढे आला, तर 'लिव्ह इन'मध्ये जाण्यापेक्षा विवाहसंस्थेतच सुधारणा करायला काय हरकत आहे, असे मतही व्यक्त झाले. विवहसंस्थेतील कटकटी आणि जाचक जबाबदाऱ्या टाळण्यासाठी 'लिव्ह इन'पर्याय ठरू शकतो, यावर मात्र त्यात एकमत झाले.

स्त्री-पुरुष लैंगिक संबंधाचा आपल्या समाजामध्ये बाऊ केला जातो, त्यामुळे 'लिव्ह इन' रुचेल असे वाटत नाही. तरीही 'लिव्ह इन'मध्ये दोघांनाही दिलासा मिळेल, असे काहीतरी नक्कीच आहे; पण असे स्वातंत्र्य उपभोगण्यापेक्षा, आहे त्या विवाहसंस्थेतच सुधारणा करायला हवी, असे मत मंगला आठलेकर यांनी मांडले.

'लिव्ह इन'चे अर्थकारण हे त्या दोघांवर अवलंबून असते, त्यात समानता असते, नियमावली असते आणि कमिटमेंटही असते. तरीही 'लिव्ह इन'ची संकल्पना अजूनही अस्पष्ट आहे, त्यात जर प्रयोग झाले, तर ती अधिक स्पष्ट होऊ शकेल, अशी मांडणी सतीश तांबे यांनी केली.

लग्नसंस्था भेदांवर आधारित आहे, त्यात कधीही समानता येऊ शकणार नाही, त्यामुळे 'लिव्ह इन'अनुभवायला हरकत नाही. जर घटस्फोटाचे कायदे सोपे केले, तर 'लिव्ह इन'चे आकर्षण कमी होईल. यासाठी कायदा नसला तरीदेखील 'लिव्ह इन'ला कायद्यात मान्यता नाही, असेही नाही, फक्त त्यामुळे स्वैराचार होत नाही ना, याची काळजी घ्यायला हवी अशी भूमिका ॲड. असीम सरोदे यांनी मांडली.

शाल्मली पेठे यांनी 'लिव्ह इन'च्या

पर्यायाला सहमती व्यक्त केली. विवाहामुळे नवऱ्याकडच्या अख्ख्या कुटुंबाची नातीही येतात. 'लिव्ह इन'मध्ये या जबाबदाऱ्या टाळणे शक्य असते, तिथे स्त्रीला अधिक सुरक्षा, स्वातंत्र्य मिळू शकते, शहरातील स्त्रीला त्याची अधिक माहिती आहे, त्यामुळे ग्रामीण स्त्रीपेक्षा शहरी स्त्रिया त्याकडे अधिक आकर्षित होऊ शकतील, असे त्या म्हणाल्या.

फॅशन किंवा कायद्याचे बंधन नाही म्हणून 'लिव्ह इन'ला होकार देऊ नये, तर तिथेही दोघांवर समान जबाबदारी असते, कमिटमेंट असते आणि त्यातील परिणामां-साठीही दोघेच जबाबदार असतात. त्यामुळे 'लिव्ह इन'मध्ये केवळ पुरुषाला दोषी ठरवण्यात अर्थ नाही, असा विचार नीरजा यांनी मांडला.

'लिव्ह इन'मध्ये जाण्याचा निर्णय दोघांनी स्वतःच्या मर्जीने घेतलेला असतो. तो किंवा ती व्यक्ती कोणत्याही क्षणी सोडून जाऊ शकते, याची पुरेशी जाणीव त्या दोघांनाही असते. मग अशा वेळेस बाईला त्या पुरुषापासून गर्भधारणा झाली आणि तो पुरुष सोडून गेला तर....? तर बाईने पुरुषाला दोष देऊ नये, कारण असे काही होऊ शकते याची जाणीव तिने ठेवायला हवी आणि मुलाला 'सिंगल मदर' म्हणून वाढवायला हवे, असे मतही परिसंवादात मांडले गेले.


धोके लग्न आणि लिव्ह इन दोन्ही-कडेही असतात. त्यामुळे हा निर्णय व्यक्तिसापेक्ष आहे. तुम्ही स्वतःला लग्नामध्ये सुरक्षित समजत असाल तर लग्न करा, पण तुम्हाला तुमचे स्वातंत्र्य हवे असेल तर लिव्ह इन आहे. याचा अर्थ लिव्ह इनमध्ये जबाबदाऱ्या, विश्वास आणि भावना नसतात असे नाही, असेही वक्त्यांनी आवर्जून स्पष्ट केले.

या परिसंवादाआधी 'ग्रंथाली'च्या नऊ नवीन पुस्तकांचे प्रकाशन झाले. ही प्रकाशने डॉ. पी.एस.रामाणी, डॉ. नरेंद्र जाधव आणि प्राचार्य व्ही.एन. मगरे ह्यांच्या हस्ते करण्यात आली. यामध्ये स्मिता भागवत यांच्या 'नाही चिरा नाही पणती'(ऐतिहासिक व्यक्तींवर आधारित), प्रा. साहेबराव चवरे यांच्या 'वानुळा'(माणदेशातील व्यक्तींचा वेध), डॉ. उज्ज्वला दळवी यांच्या 'जेनेटिक्स कशाशी खातात?'(जुनकशास्त्राची सोपी ओळख), डॉ. यशवंत पाठक यांच्या 'अंतरीचे धावे'(ज्ञानेश्वरीवर आधारित) आणि 'पहाटसरी' (संत तुकारामांच्या ओव्यांचा नव्याने विचार), सदानंद डबीर यांचे 'काळिजगुंफा'(गजलसंग्रह), शरद बेडेकर यांच्या 'आत्मा हा भ्रम, परमात्मा महाभ्रम, तर मग अध्यात्म हे काय?' (तत्त्वचिंतनात्मक), चंद्रशेखर सानेकर यांचे 'एक अजब कोलाहल'(गझलसंग्रह) आणि नंदिनी-सुधीर थत्ते यांचे 'नोबेलनगरीतील नवलकथा २०१२' या पुस्तकांचा समावेश आहे.

ग्रंथालीच्या विश्वस्त आणि कवयित्री उषा मेहता यांना को.म.सा.प.चा आणि नीरजा यांना महाराष्ट्र फाउंडेशनचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यानिमित्त डॉ. रामाणी आणि डॉ. जाधव यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदिका स्नेहा आघारकर यांनी केले.

**- प्रतिनिधी**


**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

## पश्चिम घाट बचाओ मोहीम - जगदीश गोडबोले

कोणत्याही प्रवासाची सुरुवात करताना तो कसा होईल, कोठे नेईल, त्यातून पुढे काय होईल याचा काहीच अंदाज नसतो. मात्र जगाचा इतिहास पाहिला तर तो अशा 'प्रवासां'मधून साकार होत असल्याचे दिसेल. जगदीश गोडबोले हा इतिहासकार किंवा संशोधक नव्हता. पण निसर्गावर आणि विशेषतः सह्याद्रीवर उत्कट प्रेम असणारा चळवळ्या कार्यकर्ता नक्कीच होता. त्याच ओढीतून त्याने १९८७-८८ मध्ये 'पश्चिम घाट बचाओ मोहीम' आयोजित केली. खानदेशातील नवापूरपासून गोव्यापर्यंत सह्याद्री आडवातिडवा पालथा घालणारी, अनेक सह्याद्रीप्रेमींची ही पदयात्रा राष्ट्रीय पातळीवरही लक्षवेधक ठरली. तिला दक्षिणेतील कर्नाटक, केरळ, तामिळनाडू राज्यांचीही साथ लाभली. पश्चिम घाटातील पर्यावरण, वन-जीवसंपदा, संस्कृती-परंपरा आदींची गंभीरपणाने दखल घेणारी, केंद्र सरकारने नेमलेली डॉ. माधव गाडगीळ समिती हे याच मोहिमेतून उभ्या राहिलेल्या कार्यकर्त्यांच्या 'पश्चिम घाट बचाव गटा'च्या प्रयत्नांचे फलित आहे.
अशा एका 'प्रवासा'ची ही कहाणी...

# जाखडी नृत्य (बाल्या-नाच)

**वैजंता गोगावले**

कोकण प्रांतातील निसर्गसौंदर्याप्रमाणे तेथील लोककलाही मनमोहक आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'जाखडी' नृत्य. 'जाखडी'मधील 'खडी' म्हणजे उभे राहणे. हा नाच उभ्याने केला जातो, म्हाणून त्यास जाखडी असे म्हटले जाते. जाखडीचा आणखी एक अर्थ होतो - 'जखडणे'. जाखडीमध्ये नृत्य करणाऱ्यांची शृंखला तयार केली जाते. जाखडीनृत्यास 'बाल्या नाच' असेही म्हटले जाते. मुंबईत ग्रामीण भागातील शेतकरी घरगड्याचे काम करत असत. त्यांच्या कानात बाली हे आभूषण असे. त्या आभूषणावरून ते करत असलेल्या नृत्याला, बाल्या नाच असे नाव पडले. बाल्यानाच अथवा जाखडी नृत्यास रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी 'चेऊली नृत्य' असेही म्हणतात. त्याला महाराष्ट्रात लोकप्रियता मिळत आहे.

त्या कलाप्रकाराचा उगम शाहिरी काव्य, तमाशा या लोककलांपासून सुरू झाला. त्यात कलगीवाले व तुरेवाले असे दोन पंथ असतात. (संदर्भ- वि. ल. भावे 'महाराष्ट्र सारस्वत'). बाल्या-नाचाला कलगीतुरा किंवा शक्ती-तुऱ्याचा सामना असेही म्हणतात. सहाव्या शतकानंतर होऊन गेलेले कवी नागेश यांनी कलगी या पंथाची सुरुवात केली. त्यांच्या नावावरून त्या पंथाला 'नागेशवळी' म्हणजेच नागेशाची ओळ किंवा पंथ असेही ओळखले जाऊ लागले. नागेश यांनी कलगी पंथाची स्थापना केल्यानंतर त्यांचा प्रतिस्पर्धी असलेला समकालीन कवी हरदास यांनी 'तुरेवाले' या पंथाची सुरुवात केली. त्याला हरदासवळी म्हणजेच हरदासाची ओळ किंवा पंथ असेही म्हटले जाऊ लागले. दोन पंथांपैकी एकाने शक्तीचा (पार्वतीचा) मोठेपणा आपल्या कवितेतून किंवा शाहिरीतून मांडला आणि दुसऱ्याने हराचा (शिवाचा) मोठेपणा सांगितला. पुढे, या पंथांना ओळखण्याची खूण म्हणून कलगीवाल्यांनी कलगी या चिन्हाचा वापर केला आणि तुरेवाल्यांनी आपल्या डफावर पंचरंगी तुरा लावण्याचा प्रघात पाडला. या दोन गटांत काव्यात्मक जुगलबंदी रंगते. त्या प्रकारच्या डफ-शाहिरीतून तमाशा हा लोककला प्रकार निर्माण झाला. त्याची कोकणातील आवृत्ती म्हणजे 'बाल्या-नृत्य'.

बाला-नृत्यप्रकारात एक-दोन गायक, एक ढोलकी किंवा मृदुंग वादक, एक शैलीवादक, एक-दोन झांजरीवादक व गायकांना साथ देणारे एक-दोन सुरते (कोरस देणारे) असतात. ते सर्वजण मधोमध बसतात आणि आठ ते दहा जण त्यांच्या सभोवती गोलाकार भरजरी कपडे व पायात चाळ बांधून, पायांच्या विशिष्ट हालचालींवर नृत्य करतात. प्रथम शक्तीवाले त्यांचे नृत्य सादर करतात. त्यामध्ये ईशस्तवन केले जाते. नर्तक गुंफलेल्या नृत्याच्या वेगवेगळ्या चाली सादर करतात. त्यानंतर गण-गौळण, सवाल-जवाब, साकी, प्रतिस्पर्ध्याच्या चुका काढणारे, भक्तीपर, सामाजिक अथवा सद्यस्थितीसंबंधी माहितीपर गाणी गाऊन त्यावर नृत्य सादर केले जाते. गणात गणपतीला वंदन केले जाते, तर गौळणीत कृष्णाने गौळणींना केलेला इशारा गायला जातो. नृत्यामध्ये सवाल-जवाब स्वरूपाचीही गाणी गायली जातात. तुरेवाले त्यांचा सवाल विचारतात व शक्तीवाले त्यांच्या काव्यातून त्यांना उत्तर देतात.

बाल्या-नृत्य श्रावणमास ते दिवाळी या काळात विशेष सादर केले जाते. नाचासाठी ढोलकी, मृदुंग, घुंगरू, झांज, टाळ, बासरी, सनई या वाद्यांचा वापर केला जातो. बदलत्या काळानुसार बाल्यांचे कपडे, म्हटली जाणारी गाणी यात बदल होत गेले. पूर्वी कासोटा बांधून



गोफ नृत्य

नाच केला जात असे. त्यानंतर नाचणारे धोतर घालू लागले. त्या सोबत डोक्यावर पेशवेशाही पगडी आणि कमरेला रंगीत शेला ही जाखडी नृत्याची वेशभूषा असे. हल्ली रंगेबेरंगी कपडे वापरले जातात.

जोडचाल, एक पावली, दोन पावली, तीन पावली आदी चालींवर जाखडी नृत्य केले जाते. नृत्यी करणाऱ्यांना बाल्या असे संबोधतात. उजव्या पायात भरपूर घुंगरं बांधली जातात. नृत्याची रचना प्रामुख्या.ने वर्तुळाकार असते. नृत्य करताना घुंगरू बांधलेल्या पायाने ठेका दिल्यामुळे ढोलकी, झांजरी, टाळेच्या आवाजात घुंगरांचा आवाज भर टाकतो. पायातले घुंगरू, गायकाचा उत्साहपूर्ण आवाज यामुळे नाचणाऱ्यांच्या अंगी उत्साह संचारतो आणि ते गीत-वाद्यांच्या तालावर आरोळ्या देऊ लागतात. गाण्याच्या मधे ऐकू येणाऱ्या त्या आरोळ्यांमुळे सादरीकरणात आणखी रंग भरला जातो. मात्र पायात घुंगरू बांधून नाच करणारे दुर्मिळ आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात जाखडी नृत्य व परंपरेला मोलाचे स्थान आहे. गणेशोत्सतवात जाखडी पथके वाड्यावाड्यांतून बाल्या-नृत्य सादर करताना दिसतात. चिपळूण तालुक्यातील अनारी, कुंभार्ली, पिंपळी, टेरव, कामथे, सावडे, गांग्रई, आंबडस अशा गावांतून जाखडी पथके आढळतात. नृत्य सादर करताना शाहीर नैसर्गिक आपत्ती, तसेच समाजातील विविध समस्यांवर गीते रचतात. नृत्याच्या वेळी गीते गायली जातात. राधाकृष्णावर विशेष करून गाणी रचली जातात. वासुदेवाची गाणी अथवा भारूडा-सारख्या लोकप्रकारांतून केली जाणारी जनजागृती जाखडी नृत्यातील गीतांतही दिसून येते. जाखडी नृत्यातील गीतांमध्ये 'गणा धाव रे...' हे गीत विशेष प्रसिद्ध आहे.

बाला-नृत्यात गोफ नृत्याचाही समावेश आहे. या नृत्य-गीतांना कृष्णाच्या रासक्रीडांचा पौराणिक संदर्भ आहे. नाचणाऱ्या बाल्यांचा वेशही कृष्णाप्रमाणे डोक्यावर मुकुट, दंड आणि मनगटावर बाजुबंद, गळ्यात माळा असा असतो.

गोफनृत्याचे दक्षिणेकडील 'पिनल कोलाट्टम' आणि गुजरातमधील 'गोफगुंफन' या नृत्यप्रकारांशी साधर्म्य आढळते.

गोफनृत्य प्रकारात हातात गोफ घेतलेले बाल्या नृत्यासोबत गोफ विणत जातात आणि तेवढ्याच लकबीने तो सोडवतातही. गोफनृत्यासाठी नर्तकांची संख्या समप्रमाणात असावी लागते. चार, सहा, आठ अशा संख्येने त्यांच्या जोड्या असतात. गोफ रंगेबेरंगी साड्या, ओढण्या अथवा कपड्यांपासून तयार केला जातो. नृत्य सादर करण्याच्या जागी, नर्तकांच्या शिरोभागी आढ्याच्या केंद्रस्थानी गोफ बांधून त्याची अनेक (नृत्य करणाऱ्या व्यक्तींच्या संख्येएवढी) टोके अधांतरी सोडलेली असतात. प्रत्येक बाल्या एकेक टोक हाती घेतो. त्यानंतर गाण्याच्या तालावर आणि ढोलकीच्या ठेक्यावर नृत्य सुरू होते. काही वेळातच, बाल्या-नृत्याची वर्तुळाकार गती सोडून परस्परांना सामोरे जाऊ लागतात आणि गोफाची गुंफण सुरू होते. त्यावेळी त्यांची नृत्याची पद्धत नागमोडी (झिगझॅग) वळणाची असते. अर्ध्या जोड्या डाव्या तर उर्वरित जोड्या उजव्या बाजूने प्रवास करत गोफ गुंफत असतात. गाण्याची रंगत जसजशी वाढत जाते तसतसा गोफ घट्ट विणला जात असतो. त्या वेळी ढोलकीच्या ठेक्यावरील पदन्यास, परस्परांसोबत असलेली सुसूत्रता यांचे फार महत्त्व असते. चुकलेल्या एका पदन्यासामुळे ही गोफाची गुंफण बिघडू शकते. एका टप्प्यावर गुंफण पूर्ण होते आणि बाल्या उत्साहाने नाचू लागतात. अनेकदा, गाण्याची चाल अथवा गाणे बदलले जाते. एखादे कडवे झाल्यानंतर गोफ सोडवण्याचा भाग सुरू होतो. त्यावेळी बाल्या विरुद्ध दिशेने परस्परांना सामोरे जाऊ लागतात आणि विणलेला गोफ तितक्याच लकबीने सोडवला जातो.

काही विभागांत विशिष्ट असे मनोरे उभारले जातात. रत्नागिरीमध्ये अड्डेरवाले हरी विठ्ठल नावाचे प्रसिद्ध शाहीर होऊन गेले. त्यांची जाखडी नाचाच्या कथेवरील पुस्तकेही प्रसिद्ध होती. पूर्वी केवळ कोकणात असणारे हे नृत्य शहरातही पाहण्याची संधी मिळते. ते नृत्य कोकणी माणसाबरोबर महाराष्ट्रातील सर्व भागांतील लोकांच्या पसंतीस पडले आहे.

सध्या जाखडी नृत्याचे आधुनिकीकरण होत असल्याचे दिसून येत आहे. नृत्याच्या गाण्यांमध्ये अश्लील शब्दांचा वापर वाढला असून नृत्याची परंपरा चुकीच्या मार्गावर नेली जात आहे असे ज्येष्ठांचे म्हणणे असते. नृत्यामध्ये ईश्वराचे स्मरण आणि भावनिकता यांना स्थान होते. त्या जागी जाखडीमध्ये सिनेमाच्या गाण्यांच्या तालावर गीते गायली जातात. त्याचबरोबर गाण्याातून एकमेकांशी अर्वाच्य भाषेत बोलणे, अश्लील गाणी म्हणणे, आकर्षणासाठी नृत्यात कसरती करणे, अंगावर विद्युत उपकरणे लावणे, डोंबाऱ्याचे खेळ करत नाचणे, अशा अनेक प्रकारांनी या लोककलेत शिरकाव केला आहे. जाखडी नृत्याच्या दृकश्राव्य सीडी बाजारात येत आहेत. त्यातही चांगल्या गीतांसोबत थिल्लर स्वरूपाची गीते पाहण्यास-ऐकण्यास मिळत आहेत.

जाखडी लोककलेमधील अश्लीलता दूर व्हावी आणि या लोककलेचा पूर्वीचा बाज कायम राहावा यासाठी काही संस्था प्रयत्नशील असल्याचे दिसते. चिपळूण तालुक्याात रत्नाकर दळवी यांच्याकडून दरवर्षी जाखडी नृत्याच्या स्पर्धा भरवण्यात येतात. त्या स्पर्धांना प्रतिसाद मिळत असून, स्पर्धा जिंकणे हे जाखडी नृत्य मंडळांच्या दृष्टीने मानाचे समजले जाते. कोकणात अशा काही स्पर्धांचे आयोजन करण्यात येते.


यंदाच्या गणेशोत्सवात जाखडी नृत्याचा प्रभाव कमी झाला असल्याचे निरीक्षण वर्तमानपत्रांतून नोंदवण्यात आले आहे.

सौजन्य - लक्ष्मण पडवळ (लोककला अभ्यासक), अभय सहस्रबुद्धे

गोफनृत्याचे फोटो - 'महाराष्ट्राची परंपरा मराठी वाद्यवृंद'.

**- वैजंता गोगावले**
९९६७४५८४०१
vjntgogawale@gmail.com

## वाचकदिनी प्रसिद्ध झालेली पुस्तके




मूल्य ३५० रु.
सवलतीत २०० रु.

# पहाटसरी

### यशवंत पाठक

या जगात वावरताना माणसाची जाणीव घट्ट असावी. दिखाऊपणाला किती मानायचे; याचा विचार करायला पाहिजे. याने आपल्या आतल्या आवाजाला आपण नाहीसे करतो. म्हणून आपण फुलत नाही. आपल्या आतला बहर करपतो. यासाठी आपला विचार आपण सखोल करायला हवा. याची सवय लागावी म्हणून या 'पहाटसरी' आपल्याला देतोय. कधी कधी शब्द आपण वापरतो, तो केवळ सवयीने. त्याला अर्थाची केवढी खोली आहे याचा पत्ता नसतो. या पुस्तकात ते आढळेल. विचार करण्याची सवय जडेल. हे अवचित होणार नाही, याची पूर्ण जाणीव आहे. तरीही चांगले वाचल्याचे समाधान नक्की मिळेल.

– डॉ. यशवंत पाठक

# अंतरीचे धावे

### यशवंत पाठक




मूल्य १५० रु.
सवलतीत ९० रु.

संत तुकारामांच्या गाथेत अवगाहन करायला लागलो, की किती घेऊ आणि आणखी किती घेऊ अशी अवस्था होते. तुकोबांची जीवनाची निरीक्षणे आजची आहेत. त्यांनी केलेला मनाशी संवाद मनामनांना जोडतो. वर्तमानातला जगण्याचा सार्थ श्वास तुकोबाराय जाणतात. जगण्यातला प्रपंच ते नीट समजावतात. आपल्या कामात आपण सहज झालो की गुणावगुणांचा विवेक कळतो. अभ्यासाला दिशा लाभते. चिंतनाच्या वाटा कळो लागतात. सृष्टीला समजावून घेण्याची आस निर्माण होते. माणूसपणाचे अचूक निदान करता येते. गाथ्यातून हे लक्षात येते. जगण्याचे मूळ जगण्याच्या समंजस भानात आहे. अहंतेत संसार अडकला की प्रकृती बिघडते. पुरुष सैरभैर होतो. काळाचा आव सुटतो. आपण नक्की काय करत आहोत तेच कळत नाही. यासाठी तुकारामांनी विचार कसा करावा याचे पाठ गाथ्यातून दिले. त्यांनी साध्या साध्या दृष्टांतातून प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर गोफ विणला आहे. यातून बाह्य जग आणि अंतर्मन यांचा झगडा आकळतो. संसारातील नाती नीट समजतात. जन हे सुखात आणि दिल्याघेतल्यात बुडते. हे तुकोबाराय लक्षात आणून देतात.

तुकारामांच्या गाथेतले अंतरंग असे टिपले आहे. ते आपल्याला देतोय...

– डॉ. यशवंत पाठक

## शाळा-कॉलेज-वाचनालयांसाठी खास सवलतीत मूळ ७०७५ रुपयांचे चार एकत्रित संच टपालखर्चासह ५००० रुपयांत

### डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी




'बोल महामानवाचे' – जनआवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १५० रु.

'रवींद्रनाथ टागोर' – डिलक्स आवृत्ती संच
मूळ किंमत १७०० रु. सवलतीत १२०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

### बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी संपादित केलेली तीन महत्त्वपूर्ण प्रकाशने

**'अस्मितादर्श' मधील**
**निवडक वैचारिक लेख, कथा, कविता**




संच – मूळ किंमत ९७५ रु. सवलतीत ६८० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

### इंग्रजी थिसॉरसच्या धर्तीवर मराठीत प्रथमच सुरेश वाघे लिखित 'संकल्पनाकोश'चे पाच खंड




संचाची मूळ किंमत ३२०० रु. सवलतीत २४०० रुपयांत
अधिक टपाल खर्च २०० रु.

ग्रंथाली
द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई-४०००१६ ● दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५० ● granthali02@gmail.com

# वाचकदिन क्षणचित्रे



स्मिता भागवत – 'नाही चिरा नाही पणती'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी





चंद्रशेखर सानेकर – 'एक अजब कोलाहल'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी





डॉ. उज्ज्वला दळवी – 'जेनेटिक्स कशाशी खातात?'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी





शरद बेडेकर – 'आत्मा हा भ्रम, परमात्मा हा महाभ्रम, मग अध्यात्म ते काय?'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी





साहेबराव चवरे – 'वानुळा'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी






नंदिनी थत्ते
'नोबेलनगरीतील नवलस्वप्ने–२०१२'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी





सदानंद डबीर – 'काळिजगुंफा'
पुस्तकाच्या प्रकाशनसमयी



यशवंत पाठक यांच्या 'अंतरीचे धावे' आणि 'पहाटसरी' या दोन पुस्तकांचे प्रकाशन. समारंभाला पाठक उपस्थित राहू शकले नाहीत.





RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

ग्राहकों हेतु सेन्ट्रलाइट
Centralites for Customers

सेंट्रल बैंक ऑफ़ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी "केंद्रित" "CENTRAL" TO YOU SINCE 1911

आयएसओ २७००१:२००५ प्रमाणित




सेंट्रल बँक ऑफ इंडियाने अत्यंत सुरक्षित अत्याधुनिक नेटबँकिंग आणि मोबाईल बँकिंग सेवेला प्रारंभ केला आहे. म्हणूनच आमच्या ग्राहकांसाठी बँकिंग ही आनंदायी बाब आहे. फिक्स डिपॉझिट खात्यातील सर्व व्यवहार, कर भरणा, चेकबुक्स, विवरणे, डिमॅट अकाऊंट इत्यादी सर्व व्यवहार आमच्याकडे ऑनलाईन आहेत.

सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया ही भारतातील एक अग्रेसर ग्राहक केंद्री बँक असून तुमच्या स्वप्नांना सामर्थ्य देणाऱ्या योजना आणि उत्पादने हीच आमची वैशिष्ट्ये आहेत.

**सेंट्रल बँक कुटुंबाचे सभासद व्हा आणि 'टच बँकिंग' चा आनंद घ्या.**

*आम्ही पंतप्रधान राष्ट्रीय निवारण निधी (PMNRF) साठी सढळ हस्ते दान देण्याचे आवाहन करतो.*
*आम्ही ऑनलाईन देणग्या स्विकारतो. प्राप्तिकर कायदा १९६१ च्या कलम ८०जी च्या अंतर्गत देणग्या पूर्णपणे करमुक्त असतील.*

**www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा किंवा कस्टमर केअर नं.: १८०० २०० १९११ वर कॉल करा (टोल फ्री)**

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली' करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.